विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे | अंक पाचवा

मे २०२२



## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# राज्य कार्यकारिणी बैठक : पुणे : क्षणचित्रे




राज्य कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते झाले. संजय बनसोडे, सुशिला मुंडे, माधव बावगे, महादेवराव भोईभार उपस्थित होते.




महा. अंनिसचे उपाध्यक्ष प्रा. शामराव (अण्णा) पाटील यांनी बैठकीला सदिच्छा भेट दिली. शामसुंदर महाराज सोन्नर, माधव बावगे उपस्थित होते.




राज्य कार्यकारिणी बैठकीला राज्यभरातून उपस्थित असलेले राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष, सचिव आणि प्रमुख कार्यकर्ते



संविधान अभ्यासक प्रा.सुभाष वारे यांनी बैठकीला सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.




'फलज्योतिषःभ्रमातून वास्तवाकडे' या पुस्तकाचे प्रकाशन शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या हस्ते झाले. यावेळी विशाल विमल, संजय बनसोडे, लेखक डॉ. नितीन शिंदे, सुशिला मुंडे, प्रा. शामराव (अण्णा) पाटील, माधव बावगे, मच्छिंद्रनाथ मुंडे उपस्थित होते.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

• **संपादक**
नितीन शिंदे

• **कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

• **सहसंपादक**
एकनाथ पाटील

• **सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

• **व्यवस्थापकीय संपादक**
विशाल विमल
अजय भालकर

• **सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

• **सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार

• **कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

**वार्षिक वर्गणी**
**४००** रु. (व्यक्तीसाठी) **५००** रु.(संस्थेसाठी)

• **वर्गणी पाठविण्याची सुविधा** :
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खालील बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
**विवेक जागर संस्था,**
**आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे**
**खाते नंबर** : 646301002757
**IFSC Code :** ICIC0006463

• वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर ९३५९०८०८२० या व्हॉटस्‌अप नंबरवर पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठविली जाईल.

**मुद्रितशोधन** : प्रल्हाद मिस्त्री
**मुखपृष्ठ** : गणेश पोतदार
**स्वागतमूल्य** : ₹ २५/-

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष दुसरे । अंक पाचवा । मे २०२२**

## अनुक्रमणिका

• **संपादकीय** २
• **प्रासंगिक**
**कामगार भवितव्याचे अंधारयुग** / प्रा. डॉ. अरुण शिंदे ३
• **अभिवादन**
**अहिल्यामाईचे धार्मिक धोरण : एक चिकित्सा** / प्रा. डॉ. काशिलिंग गावडे ७
• **कविता** / राजेश देवरुखकर ८
• **संतांचिये द्वारी**
**धार्मिक व सामाजिक चळवळीचे प्रणेते : महात्मा बसवण्णा**
– प्रा.डॉ.मांतेश हिरेमठ ९
• **जातवास्तव**
**'डाकीण'... संपता संपेना!** / विनायक सावळे १२
**तोडूया जाती-धर्माच्या बेड्या** / ॲड. मनीषा महाजन १३
• **मनापासून**
**आनंदाचा शोध** / डॉ . प्रदीप पाटकर १५
• **विज्ञानविश्व**
**खरंच तारा तुटतो का?** / शंकर शेलार १६
• **बुवाबाजी**
**कपिले बाबाची भोंदूगिरी** / माधव बावगे १७
• **चमत्कार जनामनातील**
**...तसाच संदेश अंड्यावरी दिसे** / मच्छिंद्रनाथ मुंडे २१
• **जडणघडण**
**...ही तर प्रथम माझीच गरज होती** / रविंद्र पाटील २२
• **पुस्तक परिचय ।**
**जेंडर डेंजर बॉक्स** / प्रा. शाम जोगळेकर २४
• **संघटीतपणे पुढे जाण्याचा निर्धार** / सुशीला मुंडे २५
• **तर्कशील सोसायटी पंजाब / गुरमीत सिंह** / अनुवादः उत्तम जोगदंड २६
• **विविध उपक्रमांच्या वाटेवर** / अनिल शोभना वसंत २८
• **महाराष्ट्र अंनिसची खबरबात** / विशाल विमल २९
• **विवेक विज्ञान शब्दकोडे** / उत्तम जोगदंड ३२

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

संपादकीय

# ...जगाला प्रेम अर्पावे

चित्रपट हे समाजमनावर तात्काळ आणि दूरगामी परिणाम करणारे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाचा सदुपयोग करून समाजाला विधायक दिशा देण्याचे, लोकांचे प्रश्न मांडण्याचे रचनात्मक प्रयोग यापूर्वी अनेक दिग्गज दिग्दर्शकांनी केले आहेत. तशा चांगल्या चित्रपटांची दीर्घ परंपराही आपल्याकडच्या हिंदीसह अन्य प्रादेशिक चित्रपट क्षेत्रांमध्ये आहे. निखळ मनोरंजनाबरोबरच समाजदर्शन, प्रबोधन आणि अर्थार्जन असे वेगवेगळे हेतू ठेवून चित्रपटांची निर्मिती केली जाते. मात्र अलीकडच्या काळात चित्रपटासारख्या माध्यमाचा उपयोग करुन आपापले सोयीचे संधीसाधू राजकारण करणाऱ्या धोकादायक प्रवृत्ती समाजात फोफावत निघाल्या आहेत. चित्रपटासारख्या कलाक्षेत्राला आणि निकोप समाजाच्या निर्मितीला मात्र हे वर्तमान मारक आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या आणि कलाबाह्य कारणांनी देशभर सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आलेल्या 'द काश्मीर फाईल्स' या चित्रपटाने हा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.

१९९०च्या दशकात काश्मिरी पंडितांचे काश्मीरमधून झालेले स्थलांतर हा काश्मीरच्या इतिहासातला एक संवेदनशील विषय आहे. त्यामागच्या कारणांची अनेक बाजूंनी चर्चा होऊ शकते. पण 'द काश्मीर फाईल्स' या चित्रपटामुळे जी चर्चा सध्या अधिक जोर धरते आहे, ती मात्र देशाच्या अखंडतेला, सहिष्णुतेला आणि एकात्मतेला बाधा आणणारी आहे. काश्मिरी पंडितांबरोबरच दहशतवादाच्या वरवंट्याखाली तिथला सामान्य मुस्लिम समाजही गेली अनेक वर्ष भरडला गेला आहे. मात्र या वास्तवाकडे डोळेझाक करून धार्मिक ध्रुवीकरणाआधारे राजकीय हितसंबंध जपण्याच्या उद्देशानेच हा चित्रपट बनवला गेला आहे, असे चित्रपट पाहाताना सतत जाणवते. काश्मीरमधला सरसकट मुस्लिम समाज काश्मिरी पंडितांच्या विरोधात उभा असल्याचे चुकीचे चित्र हा चित्रपट उभा करतो, जे चित्र वास्तवाला धरून नाही. काश्मिरी पंडितांच्या विस्थापनाची वेदना मांडण्याचा आभास निर्माण करणारा हा चित्रपट मुस्लिम समाजाला लक्ष्य करण्याचे आणि त्या माध्यमातून हिंदू अस्मितेचे हितसंबंधी राजकारण करतो.

चित्रपट प्रदर्शित झाल्या पाठोपाठ केंद्र सरकारचे पाठबळ असलेल्या काही राज्यांनी तो तातडीने करमुक्तही केला. तर अनेक ठिकाणी राजकीय हेतूने या चित्रपटाचे मोफत शो आयोजित केले जात आहेत. ज्या हेतूने या चित्रपटाचे मोफत शो आयोजित केले जात आहेत, त्याचा विचार करता अशा प्रकारच्या कृतीने देशांतर्गत संघर्षाला आपण निमंत्रण देत आहोत. जो संघर्ष आपल्याला कोणत्याही अर्थाने परवडणारा नाही. आज जगभरात ज्या ज्या देशांमध्ये अशा स्वरूपाचा अंतर्गत संघर्ष सुरू आहे, त्या प्रत्येक देशाला फार मोठी किंमत चुकवावी लागली आहे. त्या दिशेने पडत चाललेली आपली पावलं आणि त्यामधले धोके आपण वेळीच ओळखायला हवेत. सांप्रदायिक वातावरणावर स्वार होऊन अस्मितांचे राजकारण करणाऱ्या मूठभरांना इथल्या धर्माधर्मांत सलोखा निर्माण करणारी सहिष्णू परंपरा नेहमीच अडचणीची ठरत आलेली आहे. त्यामुळे संधी मिळेल त्या त्या वेळी शक्य त्या सर्व माध्यमांचा वापर करुन ते तिच्यावर आघात करीत आले आहेत. कसोटीच्या अशा प्रसंगांवेळी संविधानावर विश्वास ठेवून वाटचाल करू इच्छिणाऱ्या जबाबदार नागरिकांची जबाबदारी वाढत निघाली आहे.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये घडलेल्या घटनांचा बदला म्हणून आता त्या स्थलांतराशी कुठल्याही अर्थाने संबंध नसलेल्या देशभरातील मुस्लिमांवर हल्ले व्हावेत, अशी मानसिकता निर्माण करणारा चित्रपट ही एक चांगली कलाकृती आहे, असे कसे म्हणावे? काश्मिरी पंडितांच्या विस्थापनामागच्या खऱ्या कारणांचा शोध घेणे आणि अशा तऱ्हेची घटना देशात पुन्हा कुठेही घडू नये यासाठीची योग्य दक्षता सूचित करणे, असे सूत्र नजरेसमोर ठेवून हा चित्रपट बनवता येणे शक्य होते. जगाच्या पाठीवरच्या कोणत्याही समूहाचे आपल्या भूमीपासून तुटले जाण्याचे दुःख वेदनादायी असते. लोकांच्या भावना भडकावून या प्रश्नावरचे उत्तर कदापि सापडणे शक्य नाही. उलट उथळ आणि सवंग पद्धतीने मांडणी करून नव्या प्रश्नांना जन्माला घालणे धोक्याचे आहे. अभ्यासाशिवाय केवळ सोशलमीडियावरच्या सवंग आणि अर्धवट माहितीवर आधारित आपले मत ठरविणाऱ्या उद्याच्या पिढीच्या भवितव्याच्या दृष्टीने हे खूपच धोकादायक आहे. संविधानाने समाजातल्या प्रत्येक घटकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिलेले आहे. मात्र या स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे. एखाद्या कलाकृतीच्या माध्यमातून अथवा त्या कलाकृतीच्या आधारे समाजात द्वेष पसरवणे, हा सुद्धा एक प्रकारचा सांस्कृतिक दहशतवादच आहे. अशा दहशतवादाला कधी धर्म नसतो. त्यामागे मूठभरांचे हितसंबंध गुंतलेले असतात. बहुसांस्कृतिकता ही भारताची खरी ओळख आहे. द्वेषाने द्वेष वाढत जातो आणि प्रेमाने प्रेम. उद्याच्या काळात आपल्याला प्रेमाची, सहिष्णुतेची वाट अधिक विकसित करावी लागणार आहे आणि त्यासाठी 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या साने गुरुजींनी सांगितलेल्या रस्त्यावरुनच पुढे जावे लागणार आहे.

**– संपादक मंडळ**



# कामगार भवितव्याचे अंधारयुग

प्रा. डॉ. अरुण शिंदे
९४२१०२४०५५

भारतामध्ये इ. स. १८५० ते १८७० या काळात आधुनिक कारखानदारीचा पाया घातला गेला. याच काळात 'भारतीय कामगार वर्ग' उदयास आला. त्या नंतरच्या काळात कारखानदारीची व कामगारवर्गाची वाढ अतिशय वेगाने झाली. १८९० सालापर्यंत सर्वच क्षेत्रांतील कामगारांच्या कामांचे तास सरासरी पंधरा ते सोळा इतके होते. यात महिला व बालमजुरांचाही समावेश होता. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे बालमजुरांत सहा वर्षांखालील मुलेही असत. कामगारांच्या सुरक्षिततेबाबत मालक पूर्णतः बेफिकीर असत. कामगारांकडून यंत्राप्रमाणे काम करून घेतले जाई. स्त्रियांसाठी स्वच्छतागृहादी प्राथमिक सुविधाही नसत. त्यांचे अनन्वित हाल होत. कामगारांना माणूस म्हणून कसलीही वागणूक दिली जात नसे. मुंबई इलाख्यात कापड गिरण्यांमध्ये पुरुषांना वेतन दरमहा १२ रुपये, महिलांना दरमहा ९ रुपये आणि मुलांना दरमहा ५ रुपये इतके होते. कारखान्यामध्ये कामगारांना कसल्याही सोयीसुविधा नसल्यामुळे व अत्यल्प वेतनामुळे त्यांचे जीवनमान 'अमानुष व पशुतुल्य' होते, असे वर्णन खुद्द सरकारी लेबर कमिशननेच केले आहे.

म. फुल्यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांनी 'बॉम्बे मिल हँडस् असोसिएशन' ही देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. गिरण्यांतील प्रमुख जॉबर मंडळींबरोबरच विठ्ठलराव कोरगांवकर, कृ. अ. केळूसकर, रामचंद्रराव शिंदे इत्यादी सत्यशोधक नेते कामगार संघटना बांधण्याच्या कामात अग्रेसर होते. २५ व २६ सप्टेंबर १८८४ रोजी परळ व भायखळा येथे गिरणी कामगारांच्या प्रचंड सभा झाल्या. सभेतील ठरावानुसार ५५०० कामगारांच्या सह्यांचे एक निवेदन फॅक्टरी कमिशनला देण्यात आले. दर रविवारी सुट्टी असावी, दुपारी अर्धा तास सुट्टी द्यावी, सकाळच्या साडेसहापासून सूर्यास्तापर्यंतच काम करून घ्यावे, गिरणीत काम करताना दुखापत झाल्यास कामगारांना पूर्णपगारी रजा द्यावी, एखाद्या कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी इत्यादी मागण्या लोखंड्यांनी केल्या होत्या.

१८९० साली गिरण्यांमध्ये कापडांचे शिलकी साठे वाढल्याचे कारण देऊन दरमहा आठ दिवस गिरण्या बंद ठेवण्याचा निर्णय गिरणी मालक संघाने घेतला. त्यामुळे कामगारांचा दरमहा पावपट पगार कमी झाला. या निर्णयाविरोधात २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावर दहा हजार कामगारांची सभा लोखंड्यांनी घेतली. या सभेत स्त्री कामगारांनीही भाषणे करून आपल्या व्यथा मांडल्या. या अपूर्व घटनेसंदर्भात मनोहर कदम म्हणतात, गिरण्यातील स्त्रियांना गिरण्यात व घरात रात्रंदिवस राबावे लागत होते. पुरुषप्रधान देशातील शोषित कामगार स्त्री जाहीरपणे बोलली, ही घटना सत्यशोधक चळवळ ही स्त्री-शूद्रातिशूद्रांच्या उत्कर्षाची चळवळ होती व स्त्रिया आणि मुलांच्या शोषणाबद्दल लोखंड्यांनी केलेल्या जागृतीचेच प्रतीक होती.. कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी म्हणून लोखंड्यांनी वारंवार पाठपुरावा केला. विविध कारणे देऊन गिरणी मालक संघाने या मागणीस नकार दर्शविला होता. पण रेसकोर्स मैदानावरील कामगारांच्या प्रचंड सभेतून जाणवलेली ताकद व लोखंड्यांच्या रेट्यामुळे १० जून १८९० रोजी गिरणी मालक संघाने दर रविवारी कामगारांना सुट्टी देण्याचा ठराव केला. कामगार वर्गाच्या एकजुटीने मिळविलेला हा भारतातील पहिला विजय होता.

कामगारविषयक सर्वंकष प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी १८९० मध्ये हिंदुस्थान सरकारने एक फॅक्टरी कमिशन नेमले. मुंबई इलाख्यातील कामगारांचे प्रतिनिधी म्हणून नारायणराव लोखंडे या आयोगाला साहाय्य करीत होते. या कमिशनने केलेल्या शिफारशींच्या आधारे १८९१ चा 'फॅक्टरी ॲक्ट' मंजूर करण्यात आला. या कायद्यान्वये रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळू लागली. नऊ वर्षांखालील मुलांना गिरण्यांत काम करण्यास मनाई करण्यात आली. नऊ ते चौदा वर्षांच्या मुलांना सात तास काम देण्यात येऊ लागले. स्त्रियांनी दर दिवशी अकरा तास काम करावे आणि त्यांना रात्रपाळीस बोलावू नये, अशी तरतूद करण्यात आली. मुलांना काम करूनही शिक्षणाची संधी मिळावी यासाठी प्रत्येक पाळीत मुलांना शिक्षणासाठी सोडण्याची वेळ ठरविण्यात आली. नव्या फॅक्टरी ॲक्टची गिरणी मालक मुळीच अंमलबजावणी करीत नव्हते. लोखंड्यांनी ही बाब उदाहरणांसह 'दीनबंधु'मधून सातत्याने मांडून सरकारच्या निदर्शनास आणली. तेव्हा सरकारने या प्रकरणांची चौकशी करून अशा गिरणी मालकांवर खटले दाखल केले.

लोखंड्यांनी १८८० साली मुंबईहून 'दीनबंधु' पत्र सुरू केले. 'कामगारांच्या हिताला वाहिलेले पत्र' असे 'दीनबंधु'च्या मुखपृष्ठावर छापलेले असे. कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे अनेक लेख 'दीनबंधु'तून प्रकाशित झाले आहेत. लोखंड्यांच्या कामगार संघटनेने कामगारांचे कामाचे तास कमी व्हावेत, कामाच्या ठिकाणी आरोग्यास पोषक वातावरण असावे, कामगारांची घरे चांगली व कामाच्या जवळ असावीत, कामगारांचे दारूचे व्यसन दूर व्हावे, कामगारांमध्ये शिक्षण प्रसार व्हावा यासाठी विविध योजना मांडून त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले.

भारतातील सर्व कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँगेसची स्थापना १९२० साली झाली. पुढे संघटनात्मक पातळीवर कामगारांच्या हक्कांसाठी मोठमोठे लढे झाले. संप, हरताळ, निदर्शने, मोर्चे अशा लोकशाही मार्गांनी कामगारांनी सेवाशर्ती, सुरक्षा व न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला. कामगारांची एकजूट व संघटनात्मक ताकदीमुळे कामगारहिताचे काही कायदे सरकारने केले. स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे कामगारहिताला प्राधान्य देण्याकडे राज्यसंस्थेचा कल होता. कामगारांच्यासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले. कामगारहिताचे कायदे केले गेले. 'भारतातील कामगार चळवळ' या सुकोमल सेनलिखित पुस्तकामध्ये कामगारलढ्याचा सविस्तर इतिहास आलेला आहे.

केंद्रसरकारने सन २०२० मध्ये कामगार कायद्यांमध्ये मोठे बदल केले. 'औद्योगिक संबंध कायदा', 'व्यावसायिक सुरक्षा, स्वास्थ्य आणि कार्यस्थिती कायदा', सामाजिक सुरक्षा कायदा' असे तीन नवे कायदे केंद्र सरकारने संसदेमध्ये पास केले. सामाजिक सुरक्षा कायद्या'ने सामाजिक सुरक्षेवरील या पूर्वीचे नऊ कायदे रद्द केले. त्यांमध्ये कर्मचारी भविष्य निधी अधिनियम १९५२, मातृत्व लाभ अधिनियम १९६१इत्यादींचा समावेश आहे. 'औद्योगिक संबंध कायद्या'ने पूर्वीचे औद्योगिक अधिनियम विभाग १९७४, व्यापार-संघ अधिनियम १९२६, औद्योगिक रोजगार अधिनियम १९४६ इत्यादी कायदे निरस्त केले गेले. 'व्यावसायिक सुरक्षा, स्वास्थ्य आणि कार्यस्थिती' या कायद्यामध्ये पूर्वीचे १३ कायदे रद्द केले गेले. एकंदरीत पाहता, या पूर्वीचे पंचवीस कायदे रद्द करून त्या जागी नवीन तीन कायदे अमलात आणलेले आहेत.

'औद्योगिक संबंध संहिता विधेयक २०२०, मधील महत्त्वपूर्ण तरतुदींनुसार तीनशेपर्यंत कामगार असलेल्या औद्योगिक प्रतिष्ठानांना कामबंदी, कामगार कपात, उपक्रम बंद करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. या पूर्वी ही मर्यादा १०० कामगार असलेल्या औद्योगिक प्रतिष्ठानांना होती. म्हणजे नवीन कायद्यांमध्ये ही मर्यादा ३०० पर्यंत वाढविलेली आहे. तसेच ३०० पेक्षा कमी कामगार असलेल्या औद्योगिक प्रतिष्ठानांना कामगारांसाठी स्थायी आदेश (स्टँडिंग ऑर्डर) तयार करण्याची आवश्यकता नाही. स्थायी आदेश म्हणजे औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कामगारांसाठी आचरण नियमावली. स्थायी आदेशामध्ये औद्योगिक प्रतिष्ठान औपचारिक रीतीने कामगारांच्या कार्यपद्धतीचे स्वरूप स्पष्ट करत असते. तज्ज्ञांच्या मते, नवीन कामगार कायद्यातील तरतुदींमुळे औद्योगिक प्रतिष्ठान कामगारांसाठी मनमानी पद्धतीने नियम तयार करतील. त्यामुळे कामगारांच्या अधिकारांवर मोठा विपरीत परिणाम होईल. याचा दुसरा अर्थ सरकार कंपन्यांना कामगार कपात, नियुक्ती वगैरेंसंदर्भात मोकळीक देण्याचा प्रयत्न करीत आहे. याचा दुष्परिणाम कामगारांवर निश्चितपणे पडेल.

औद्योगिक कामगारांना संपावर जाण्यासाठी किमान चौदा दिवस नोटीस देणे नवीन कायद्याने बंधनकारक केले आहे. या पूर्वी केवळ सार्वजनिक अत्यावश्यक सेवांमधील कामगारांना संपावर जाण्यासाठी नोटीस देण्याची आवश्यकता होती. याचा परिणाम कामगारांच्या संघटना, कामगारांचे लढे, हक्क यांवर निश्चितपणे होण्याची शक्यता आहे.

'व्यावसायिक सुरक्षा, स्वास्थ्य आणि कार्यस्थिती संहिता विधेयक २०२०, मध्ये व्यवस्थापन आणि कामगारांच्या कर्तव्यांची तरतूद केलेली आहे. तसेच कामगारांच्या सुरक्षेची मानके, कामगारांचे स्वास्थ्य, काम करण्याची स्थिती, कामाचे तास, सुट्ट्या आदींचा समावेश केलेला आहे. 'सामाजिक सुरक्षा संहिता २०२०, मध्ये भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, नुकसान भरपाई, मातृत्व लाभ आदींची तरतूद केलेली आहे. यामध्ये असंघटित व कृषी क्षेत्रातील कामगारांचाही समावेश केलेला आहे.

जटिल व कालबाह्य कामगार कायद्यांमध्ये नवीन कायद्यामध्ये कालानुरूप बदल व सुलभीकरण केल्याचे व त्यामुळे उद्योग व रोजगारांमध्ये वाढ होईल, सरकारचे मत आहे. या पूर्वी वेगवेगळ्या कायद्यांतर्गत परवान्यांसाठी वेगवेगळे अर्ज करावे लागत होते. नव्या कायद्यामुळे एकल परवाना पद्धत सुरू होईल. त्याचा लाभ उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी होईल, असे या कामगार कायद्याच्या समर्थकांचे म्हणणे आहे.

नवीन कामगार कायद्यांवर काही महत्त्वपूर्ण आक्षेपही घेतले जातात- नवीन कामगार कायदे कामगारांच्या हिताविरुद्ध व भांडवलदार धार्जिणे आहेत. भांडवलदार/औद्योगिक प्रतिष्ठानांना आपल्या मर्जीनुसार कामगारांना कामावर ठेवण्याचे/काढून टाकण्याचे स्वातंत्र्य या कायद्याने दिलेले आहे. त्यामुळे औद्योगिक प्रतिष्ठान मनमानी पद्धतीने वागतील. कामगारांना संपासाठी किमान चौदा दिवस पूर्वसूचना देण्याचे बंधनकारक करून कामगारांची व संघटनांची मुस्कटदाबी

करण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. या तरतुदीविषयी कामगार व संघटनांमध्ये तीव्र असंतोष आहे. कामगार संघटना हळूहळू मोडीत काढण्याचा प्रयत्न सरकारने सुरू केला आहे.

वरील कामगार कायद्यांना कामगार संघटनांनी विरोध केला; परंतु केंद्र सरकारने त्यांची दखल घेतली नाही. गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांमध्ये कामगारांनी व कामगार संघटनांनी असंख्य लढे, आंदोलने करून, रक्त व घाम गाळून जे कमावले, ते हळूहळू काढून घेण्याचे काम सरकार भांडवलदारांच्या हातात हात घालून पद्धतशीरपणे करीत आहे. अकुशल कामगारांचे प्रचंड शोषण सुरू आहे. अकुशल कामगारांना वेतन दरमहा सरासरी तीन ते आठ हजार रुपयांपर्यंत मिळते. त्यांच्याकडून दहा-बारा तास काम करून घेतले जाते. त्यांना कोणतीही सेवा सुरक्षितता वा सेवा शाश्वती नाही. त्यामुळे ते मालकाच्या विरुद्ध ब्र शब्द उच्चारू शकत नाहीत. तात्पुरते, हंगामी, कंत्राटी वगैरे शब्द आता चांगलेच स्थिरावले आहेत, किंबहुना ते भांडवलशाही व्यवस्थेचा भाग बनले आहेत. या सर्वांचा परिणाम कामगारांच्या भवितव्यावर होत आहे. कामगार पुन्हा अंधारयुगाकडे जाणार की काय, असे साधार भय निर्माण झाले आहे.

म्हणून कामगारांनो, श्रमिकांनो, एक व्हा. मार्क्सच्या शब्दांत 'वर्गविद्रोह करून आपल्याला वर्गसमन्वयाची वाट चालायची नाही, तर वर्गव्यवस्थाच संपवायची आहे.' श्रमिकांना सत्ताधीश बनवणे व लोकशाहीचा आशय विस्तारित करणे हीच कामगारांची व कामगार चळवळीची उद्दिष्टे आहेत. त्यासाठी सजग राहून नव्या बदलांचा नीट अन्वयार्थ समजून घेतला पाहिजे व कामगार हितासाठी सदैव दक्ष राहिले पाहिजे.

(लेखक, महा. अंनिस कोल्हापूर जिल्ह्याचे कार्याध्यक्ष आहेत.)

●




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे

# विवेक जागर प्रकाशन

आणि अन्य प्रकाशनाची अंधश्रद्धा निर्मूलन कामाशी संबंधित पुस्तके

## सवलतीच्या दरात घरपोच मिळतील

आम्ही वारस विवेकाचे

**जादुई वास्तव** — किं. २५० रु.
रिचर्ड डॉकिन्स, अनुवाद : शंतनू अभ्यंकर

**पृथ्वी मोलाचा माणुस** — किं. ३०० रु.
संपा.अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया

**जातपंचायतींना मूठमाती** — किं. २२५ रु.
कृष्णा चांदगुडे

**फलज्योतिष : भ्रमातून वास्तवाकडे** — किं. २०० रु.
डॉ. नितीन शिंदे

**ओळखा नवरत्नांचा विळखा** — किं. ८० रु.
डॉ. नितीन शिंदे

**संघटना मार्गदर्शिका** — किं. २० रु.
संपादन : विनायक सावळे

**भारतीय संविधानाचे अंतरंग** — किं. ४५ रु.
अॅड. निर्मलकुमार सूर्यवंशी

**फलज्योतिष एक भ्रम** — किं. २५ रु.
प्रकाश घाटपांडे

**शोध मनोविकारांचा** — किं. २० रु.
डॉ. प्रदीप पाटकर

**सर्प विज्ञान** — किं. २५ रु.
उल्हास ठाकूर, प्रकाश शहा

**प्रयोग चमत्काराचे** — किं. २५ रु.
मच्छिन्द्रनाथ मुंडे

**मला बरं का वाटतं** — किं. ११० रु.
मच्छिन्द्रनाथ मुंडे

**सफर विश्वाची** — किं. २०० रु.
डॉ. नितीन शिंदे

**असा विचार करायला काय हरकत** — किं. १२० रु.
डॉ. नितीन शिंदे

**यात असे आहे तरी काय ?** — किं. १२० रु.
डॉ. नितीन शिंदे

**अंतराळ समजून घेताना** — किं. ११० रु.
डॉ. नितीन शिंदे

**पत्रिका जुळविताना** — किं. ५० रु.
डॉ. नितीन शिंदे

**दोस्ती ताऱ्यांशी** — किं. ५० रु.
डॉ. नितीन शिंदे

**Friendship with stars and planets** — Rs. 50
Pramod Ganganmale

**गाणी प्रबोधनाची** — किं. २५ रु.
संपा. योगेश कुदळे

**अंधश्रद्धेची दुनिया चमत्काराची किमया (भाग १ व २)**
मच्छिन्द्र मुंडे, कुमार मंडपे, पा. न. निपाणीकर — किं. १५० रु.

**(हिंदी) भाग १ व २** — किं. ९० रु

**डॉ. नरेंद्र दाभोळकर फोटो** — किं. १० रु.

**संविधान प्रास्ताविक** — किं. २५ रु.

**माझी अध्यात्मिक वाटचाल** — किं. १० रु.
डॉ. रवींद्र टोणगावकर

**देव नावाचा भ्रम** — किं. ५००
रिचर्ड डॉकिन्स

**कोविड साथीपासून बचाव** — किं. २० रु.
डॉ. अनंत फडके

**सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा** — किं. ३० रु.
चित्रमय पुस्तिका

**अलौकीक शक्ती और पाखंड** — किं. ३०
मच्छिन्द्रनाथ मुंडे

**अंधश्रद्धा उन्मूलन आचार (हिंदी)** — किं. १५० रु.
डॉ. नरेंद्र दाभोलकर

**अंधश्रद्धा उन्मूलन विचार(हिंदी)** — किं. ३०० रु.
डॉ. नरेंद्र दाभोलकर

**अंधश्रद्धा उन्मूलन सिद्धांत (हिंदी)** — किं. ३५० रु.
डॉ. नरेंद्र दाभोलकर

**संपर्क :** ७२७६५५९३१८ / ९९६९४७३७०२
**कार्यालय :** अविनाश पाटील, कार्याध्यक्ष, महा. अंनिस, भास्कर, ६८, कालीकादेवी नगर, संगमा चौक, धुळे-०१.



# अहिल्यामाईंचे धार्मिक धोरणः एक चिकित्सा

प्रा. डॉ. काशिलिंग गावडे
८६००७३१९०१

सदाचारसंपन्न प्रजा निर्माण करणे आणि त्यांना वत्सलतेने सांभाळणे यासाठी अहिल्यामाईंनी संपुर्ण आयुष्य वेचले. देशातील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या लोकांना एका सांस्कृतिक साखळीने जोडून त्यांच्यात संपूर्ण देशाविषयी आपलेपणा निर्माण करणाऱ्या मुख्य म्हणजे समाजाच्या मनाचे उन्नयन करणाऱ्या स्वार्थरहित अशा राष्ट्रीय ध्येयाकडे प्रवृत्त करणाऱ्या केद्रांची निर्मिती त्यांनी केली.

३१ मे २०२२ हा राष्ट्रमाता अहिल्यामाई होळकर यांचा २९७ वा जयंती दिवस. अहिल्यामाईंची जन्मभूमी चौंडी, शासक भूमी इंदूर व महेश्वर तर कार्यभूमी भारत होती. अहिल्यामाई धार्मिक वृत्तीच्या होत्या मात्र अंधश्रद्धाळू मुळीच नव्हत्या. त्यांची धार्मिक वृत्ती धर्मचिकित्सेच्या कधीच आड आली नाही. त्यांनी धर्माचे पारलौकिक अंग नाकारलेले दिसते. प्रजा हेच सर्वस्व मानून त्यांनी जनकल्याणाची अनेक कामे केली. त्यांनी प्रजेसाठी भारतभर विहिरी, अन्नछत्रे, सदावर्ते आणि तीर्थस्थळी घाट व मंदिरे बांधली. त्या पाठीमागे त्यांचा केवळ धार्मिक दृष्टीकोन नसून सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टिकोन असल्याचे दिसते. भारतीय समाजावर धर्माचा अनन्यसाधारण पगडा आहे. धर्म हा जेव्हा सर्वांची धारणा करण्याची, सर्वांची उन्नती करण्याची भूमिका घेतो तेव्हा तो चांगला असतो पण समाजातील काही स्वार्थी लोक धर्माचा वापर स्वतःच्या वर्णापुरता, जातीपुरता करून घेतात. इतरांना धर्माची भीती घालून लुबाडतात तेव्हा त्या धर्मात अनेक दोष निर्माण होतात. कालानुरूप धर्मात बदल न केल्यानेही समाजात अनेक दोष निर्माण होतात. अहिल्यामाईंच्या काळातही धर्मात अनेक दोष होते ते दोष दूर करण्यासाठी समाजसुधारणांचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला.

अहिल्यामाईंना हुंडा प्रथेविषयी प्रचंड चीड होती. स्त्रीला देवी-देवता, आदिशक्ती म्हणायचे आणि तिच्या (गृह प्रवेशाचे) पैसे, सोने, वस्तू, मानपान घ्यायचा या ढोंगीपणाबद्दल त्यांना प्रचंड राग होता. हुंडयामुळे स्त्रियांचा अमानुष छळ होत असे. ही अमानुष प्रथा रोखण्यासाठी त्यांनी राज्यात हुंडाबंदी घोषित केली. हुंडा देणारा, घेणारा आणि मध्यस्थ या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतूद या कायद्यात होती. प्रजेला सुख लाभावे यासाठी त्या दक्ष राहिल्या. अशा स्वार्थी रूढी तोडणे फार कठीण असते पण ते काम अहिल्यामाईंनी केले.

धर्माच्या नावाखाली स्त्रीने नवऱ्याबरोबर स्वतःला चितेत जाळून घेणे यास 'सती' म्हटले जाई. पती खंडेरावाच्या मृत्युसमयी सासरच्या विनंतीवरून का होईना सती न जाण्याचा अहिल्यामाईंचा निर्णय त्यांच्या निर्भय स्वभावाची साक्ष देतो. मालेरावाच्या मृत्यूनंतर मैना व पिरता या त्यांच्या बायकांना सती वस्त्रे नेसवली गेली. आठ-नऊ वर्षाच्या इवल्याशा पोरींची सतीवस्त्रे पाहून अहिल्यामाईंनी त्यांना खूप अडवले. व्याहींना समजावले, पण काही उपयोग झाला नाही. उलट व्याह्यांना म्हणाले आपण इतक्या धार्मिक असूनही हे धर्मविरोधी कृत्य कसे करता? तेव्हा अहिल्यामाई ताडकन बोलल्या ''कोण म्हणतो हा धर्म, ही तर केवळ स्वार्थी कुटुंबांनी लादलेली उजेडाकडून अंधाराकडे नेणारी एक (अंध रूढी!) अंधश्रद्धा म्हणजे धर्म नव्हे, म्हणे बेचाळीस पिढ्यांचा उद्धार, स्वर्ग, घंटानाद, कुणी पाहिला स्वर्ग? कुणी ऐकल्या घंटा? अवघे कपोलकल्पित, काय हे बाईच जिणं? केवळ मरण! यांच्या जळण्याचा ना खेद ना दुःख! बाई जर मेली तर एक पुरुष जाणार नाही सती, पंधराव्या दिवशी बोहल्यावर चढेल.''

सतीची चाल किती घातक आहे हे ओळखून अहिल्यामाईंनी त्याविरोधात आवाज उठविला. आपल्या दोन सुना, दोन नातसुना आणि कन्या मुक्ता आणि तिच्या दोन सवती यांना सती जाण्यास त्यांनी कडाडून विरोध केला. सतीप्रथा विरोधी जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला. मालेराव यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सती जाण्यास तयार नव्हत्या, तेंव्हा अहिल्यामाईंनी त्यांच्या आई-वडिलांची समजूत घालून त्यांना सती जाण्यापासून रोखले.

धनिकांच्या निपुत्रिक विधवांना मूल दत्तक घेण्यासाठी संस्थानिकांच्या अधिकाऱ्यांची परवानगी लागे. ही परवानगी मिळविण्यासाठी मोठमोठ्या रकमा नजराणा म्हणून द्याव्या लागत. अहिल्यामाईंनी या प्रथेला आळा घातला. सिरोग परगण्यातील खेमदास सावकाराच्या विधवेला दत्तक घेण्याची परवानगी देण्यासाठी तेथील कमाविसदाराने तीन लाख रुपयांची लाच मागितली. अहिल्यामाईंना हे कळताच त्यांनी कमाविसदारास नोकरीतून काढून टाकले. त्या विधवेस मूल दत्तक घेण्याची मान्यता दिली.

अहिल्यामाईंच्या काळात राजेरजवाड्यांमध्ये बुरख्याचे स्तोम फार होते. परंतु त्यांनी कधीही बुरखा पाळला नाही. अहिल्यामाईंनी आपला मुलगा मालेराव यांच्या निधनानंतर आपली राजधानी इंदूरहून महेश्वरला आणण्याचे ठरविले. परंतु ज्योतिष मंडळींनी राजधानीसाठी त्या जागेस नकार दिला. तेव्हा

अहिल्यामाईंनी ज्योतिषांचा सल्ला बाजूला ठेवून महेश्वर हे गाव सर्व दृष्टींनी योग्य ठरवून व श्रेष्ठ मानून तेथेच आपली राजधानी स्थापन केली. तीस वर्षे तेथे वास्तव्य केले. महेश्वरला सांस्कृतिक राजधानी बनविले. सुवर्णयुग निर्माण केले. 'अवघी भूमी मंगल आहे' ही संत तुकारामांची उक्ती कृतीत आणून दाखविली.

अहिल्यामाईंनी गोरगरीब जनतेसाठी अनेक ठिकाणी अन्नछत्रे सुरू केली होती. महेश्वरमध्ये त्या अनेकदा विशेष पाहुण्यांना सोबत घेऊन सर्वांसमवेत जेवण करत होत्या. भिल्ल, आदिवासी, मागास जाती, मुसलमान, फकीर, सरदार, पाहुणे हे सर्वजण एकत्र जेवत असत. गोरगरीब सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र जेवू लागल्यामुळे स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव कमी झाला. समाजात त्याचे अनुकरण होऊ लागले. अन्नछत्राद्वारे अहिल्यामाईंनी अस्पृश्यता निर्मूलनास चालना दिली.

अहिल्यामाईंचा धर्मस्थळाच्या निर्मितीमागील हेतू केवळ सुंदर वास्तुंची निर्मिती करणे आणि कारागिरांना काम पुरविणे एवढ्यापुरता मर्यादित नव्हता. भारतभर अन्नछत्रे, विहिरी, धर्मशाळा बांधण्यामागे त्यांचा सामाजिक दृष्टिकोनही होता. अन्न, पाणी आणि निवारा या माणसाच्या प्रमुख गरजा पुरविण्यासाठी त्यांनी प्रचंड धडपड केलेली होती. सदाचारसंपन्न प्रजा निर्माण करणे आणि त्यांना वत्सलतेने सांभाळणे यासाठी अहिल्यामाईंनी सर्व आयुष्य वेचले. देशातील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या लोकांना एका सांस्कृतिक साखळीने जोडून त्यांच्यात संपूर्ण देशाविषयी आपलेपणा निर्माण करणाऱ्या उत्तरेतील केदारविश्वेश्वरापासून ते दक्षिणेतील रामेश्वरापर्यंत, जेजुरी क्षेत्र व पश्चिमेकडील द्वारकेपासून ते पूर्वेकडील जगन्नाथपुरीपर्यंत एका दृढ भावनिक बंधाने भिन्नभिन्न प्रदेश, भाषा, जाती असणारा समाज एकत्र करणाऱ्या व मुख्य म्हणजे समाजाच्या मनाचे उन्नयन करणाऱ्या स्वार्थरहित अशा राष्ट्रीय ध्येयाकडे प्रवृत्त करणाऱ्या केंद्रांची निर्मिती त्यांनी केली. साऱ्या धर्मक्षेत्रांना त्यांनी राष्ट्रीय स्वरूप आणले. सांस्कृतिक एकात्मता साधली आणि माणुसकी हाच खरा धर्म मांडणारा एक खरा शासक त्यांनी जगापुढे ठेवला.

अहिल्यामाईंनी भारतभर जनकल्याणाची प्रचंड कामे करून देखील तीस वर्षाच्या कारकिर्दीत त्यांचा खाजगी कोष रिता होण्याऐवजी वाढतच गेला. ही गंगाजळी पंधरा कोटी वरून वाढत जाऊन ती सोळा कोटी झाली. यावरून अहिल्यामाई धर्मभोळया नसून अर्थज्ञानी होत्या हे सिद्ध होते. म्हणूनच अहिल्यामाईंविषयी जॉन माल्कम म्हणतात की, ''त्यांचे मत रुढीप्रिय आहे, परंतु तरीही रूढीचा उपयोग त्या जनकल्याणासाठीच करतात. प्रत्येक क्षणाला सद्सद्विवेकाने कार्य करणारे त्यांचे जीवन आहे.''

(लेखक बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड येथे कार्यरत आहेत.)

•

# कविता



राजेश देवरुखकर
९१६७५६८१८७

इतिहासकारांनो शाबूत ठेवा तुमची लेखणी
करू नका तुमची लेखणी कधीच म्यान
विचारवंतांनो शाबूत ठेवा तुमची डोकी
ती ठेवू नका कधीच गहाण

ते गुंतलेत स्वतः हिटलर बनण्यात
ते गुंतलेत जनतेला गुंगारा देण्यात
जनताही गुंतलीय उन्मदाच्या गुंगाऱ्यात
पण तुम्ही नेटाने सत्य मांडा
घाबरू नका, कंबर कसा

कारण, चोर इथे साव बनतो
क्रूरकर्मा हिटलरच्या ओव्या गायल्या जातात
घरोघरी नथुरामाचे पोवाडे गायले जातात
अहिंसेच्या महामानवाच्या मृत्यूचे सोहळे होतात
हा इथला काळा इतिहास आहे

पण घाबरू नका
पाय घट्ट रोवून उभे राहा
या जगाला तुकाराम, सॉक्रेटिसच्या
जाज्वल्य त्यागाची परंपरा आहे
ते पहा, ते अमर झाले

ज्यांनी तोडले जीवघेण्या परंपरेचे पाश
झुगारले गुलामगिरीचे बांध
ज्यांनी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध केले दोन हात

इतिहासकारांनो शाबूत ठेवा तुमची लेखणी
करू नका लेखणी कधीच म्यान
विचारवंतांनो शाबूत ठेवा तुमची डोकी
ती ठेवू नका कधीच गहाण

•

(कवी, महा. अंनिसचे ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष आहेत.)



# धार्मिक व सामाजिक चळवळीचे प्रणेते : महात्मा बसवण्णा

प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ
८२७५९१८१०९

बाराव्या शतकाचा तो काळ. धर्माधीन वर्णाश्रम आणि जातीव्यवस्थेच्या प्रबळ टाचेखाली मोठ्या जनसमूहाचे सर्व प्रकारचे मानवी हक्क हिरावून घेण्यात आले होते. भारतीय समाज प्रथा-परंपरांच्या, यज्ञ-याग कर्मकांडांच्या, अंधश्रद्धांच्या जातवर्णाश्रमधर्म यांच्या विषमतेच्या अंधारात निद्राधीन झालेला होता. जेव्हा आसपास कोणी पणती देखील लावण्याची शक्यता नव्हती त्या काळी बसव तथा बसवण्णा, महात्मा बसवेश्वर नावाचा सूर्य उगवला. त्यांचा जन्म मंगळवेढा तालुक्यातील बागेवाडी येथे ब्राह्मण कुटुंबात झाला. महात्मा बसवण्णा यांच्या जन्मवर्षाबाबत मतभेद आहेत. माजी न्या. पी. बी. सावंत यांनी इ. स. ११०५ हे बसवण्णा यांचे जन्मवर्ष निश्चित केले आहे. तरीही जन्मतिथी मात्र वैशाख शुद्ध अक्षय तृतीया सर्वमान्य आहे.

तत्कालीन व्यवस्थेनुसार कृष्णा आणि घटप्रभा नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचे अध्ययन करीत असतांनाच विविध धार्मिक मान्यता, अंधश्रद्धा व कर्मकांडे, समाजातील उच्च-नीचता, स्पृश्यास्पृश्यता, जातीभेद, स्त्री आणि स्त्रियांची स्थिती यांनी त्यांचे चित्त व्यथित झाले. अध्ययन पूर्ण केल्यानंतर ते मंगळवेढा येथे आले आणि पुढे ३१ वर्षे हीच त्यांची कर्मभूमी ठरली.

**जाती-चातुर्वर्ण्याला मूठमाती**

'जी जात नाही ती जात' असे आजही कधी जातीच्या वैतागाने तर कधी जातीच्या समर्थनार्थ सुद्धा म्हटले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या विवेकाला संकुचित करणाऱ्या जातीव्यवस्थेचा अंत आजही दृष्टीपथात येत नाही. महात्मा बसवण्णा यांनी धर्मव्यवस्थेची चिकित्सा आणि त्याअंतर्गत असलेल्या वर्णव्यवस्थेचे, जातीव्यवस्थेचे उच्चाटन करण्यासाठी, सामाजिक विषमतेची उतरंड मोडून काढण्यासाठी, सामाजिक समतेसाठी आपले कार्य सुरु केले. महात्मा बसवण्णांच्या कार्याबद्दल डॉ. देशपांडे म्हणतात, ''भारतीय समाजात प्रथमतः वर्णधर्मांतर्गत विषमतेला योजनाबद्ध थारा देणाऱ्या ब्राह्मणांच्या प्रतिगामी शक्तींशी तडजोड न करणारा भारतीय मध्यवर्गातील बसवेश हा पहिला वीरभक्त होय. भारतीय समाजव्यवस्थेत बुद्ध, बसवण्णा आणि आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारून वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाची कृतिशीर आखणी केली.''

बसवण्णांनी आपली धर्म आणि समाजपरिवर्तनाची चळवळ सुरु केली. या चळवळीसाठी स्वतंत्र असे धर्मशास्त्र आणि समाजशास्त्र त्यांनी मांडले. त्यांच्या धर्मशास्त्रात आणि समाजशास्त्रात सवर्ण, स्पृश्यास्पृश्य, श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्चनीच असा जातीभेद; किवा गरीब-श्रीमंत असा वर्गभेद; स्त्री-पुरुष असा लिंगभेद;. व्यवसायावर आधारलेले व्यवसायभेद अशा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला थारा नाही. माणसाचे मोठेपण हे जातीवर अवलंबून नसून ते कर्तृत्वावर असते यासाठी त्यांनी आपल्या वचनांतून प्राचीन ग्रंथातीलच दाखले दिले -

व्यास भोईनीचा पुत्र, मार्कंडेय मातंगीचा पुत्र
कुल गोत्रांच्या अगोदर काय होते ?
साक्षात अगस्ती बेरड, दुर्वास चांभार
कश्यप लोहार, न्हावी कौंडिण्याशी
सारे त्रिभुवन जाणते पहा.
आमच्या कुडलसंगमदेवाचे वचनच असे आहे.

**अनुभव मंटपाची स्थापना**

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाचे नुसते बौद्धिक धडे देण्याने काही फारसे साध्य होणार नाही याची महात्मा बसवण्णांना कल्पना होती. आपले धर्मशास्त्र, समाजशास्त्र प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी बसवण्णांनी 'शरण' नावाने एक लोकचळवळ सुरु केली. या चळवळीतील लोकसहभागासाठी त्यांनी 'शिवानुभव मंटप' अथवा 'अनुभव मंटप' नावाने लोकशाही स्वरूपाचे एक मंडळ स्थापले, परिषद स्थापन केली. या मंडळात, परिषदेत कोणताही भेदभाव न करता सर्व जातीच्या स्त्रीपुरुषांना मुक्त प्रवेश दिला. अनुभव मंटपाचे सभासद होणाऱ्या पुरुष-स्त्रियांना 'शरण-शरणी' म्हटले जाई. उच्च समजल्या जाणाऱ्या जातींच्याबरोबरच आपल्या अनुभव मंटपात बसवण्णांनी मातंग चेन्नया, ढोर कक्कया, चांभार हरळय्या, धोबी माचय्या, न्हावी आपण्णा, कोळी कनप्पा, डोहर कक्कय्या, नुलीय चंदय्या, कुंभार गुंडय्या, अंबिगर चौडय्या, मेदार बुरुड केतय्या, तुरुंगाही रामण्णा, मादार धूळय्या, वैद्य संगण्णा, किन्नरी बोमय्या, अल्लमप्रभू अशा शूद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या जातींना प्रवेश दिला. अग्रजापासून अंत्यजापर्यंत सर्वांना चळवळीत सहभागी करून घेतले. अनुभव मंटपाच्या माध्यमातून अशा बहिष्कृत समजल्या गेलेल्या समाजातील व्यक्तींशी जिव्हाळ्याचे संबंध जोडले. बसवण्णांनी स्थापन केलेले अनुभव मंटप म्हणजे त्या काळाचे समतापीठच होते. या अनुभव मंटपाचे मुखालय कल्याण येथे ठेवले, ज्यास नंतर बसवकल्याण म्हटले जाऊ लागले.

बसवण्णांनी अनुभव मंडपाच्या कार्यपद्धतीत स्वतःसाठी

खास असे स्थान निर्माण केले नाही. अनुभव मंडपाची कार्यपद्धती त्यांनी जनसंसदेच्या स्वरुपाचीच ठेवली आणि सर्व निर्णयप्रक्रिया त्यांनी अनुभव मंडपाचे सदस्य असलेल्या शरण शरणीवर सोपवली. आपले विचार मंडळातील शरण-शरणींवर न लादता बसवण्णांनी शरण-शरणी यांच्यात लोकशाही पद्धतीने मुक्त विचारमंथनास चालना दिली. या मंडळातच धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात परिवर्तनासाठी निर्णय घेतले जाऊ लागले आणि ते प्रत्यक्ष आचरणाने अंमलात आणले जाऊ लागले. जातीभेद विलिन झालेत, स्पृश्यास्पृश्यता नष्ट झाली, शरण चळवळीतील सर्व लोकांमध्ये रोटीबेटी व्यवहार होऊ लागले, आंतरजातीय विवाह होऊ लागले. त्याविषयीचे बसवण्णांचे एक महत्त्वपूर्ण वचन आहे.

भोजन देण्याघेण्यात म्हणती झाला क्रियाहीन,
कन्या देण्याघेण्यात हुडकती जातपात,
कसा म्हणू तयांना भक्त
कसा म्हणून तयांना युक्त?
ऐक बा कुडलसंगमदेवा!

अशाप्रकारे 'शरण' ही लोकचळवळ झाली. निरर्थक कर्मकांडे व पुरोहितशाहीला विराम दिला गेला. ग्रंथाप्रामाण्य नाकारले गेले.

**बसवण्णांच्या कार्यास राजाश्रय**

बसवण्णांचे आणि त्यांच्या शरण-शरणी यांचे समतेचे आचार विचार यांचा प्रभाव सर्वदूर पसरू लागला. या कार्याने प्रभावित होऊन बिज्जल या चालुक्य राजाने बसवण्णांना आपल्या दरबारात मंत्रिपद दिले. स्वतः बसवण्णा अन्य जातीच्या तसेच अस्पृश्य समजल्या गेलेल्या महार मांगादी लोकांच्या घरी जात. त्यांच्यासोबत भोजन करत. ढोर कक्कयांना ते आजोबा मानत. मातंग चेन्नय्यांना ते वडील मानत. नागीदेव कांबळे यांच्याकडे ते जेव्हा भोजनाला गेले तेव्हा बिज्जल राजाच्या दरबारातील काही मंत्र्यांनी राजाकडे तक्रार केली की, मंत्री बसवेश्वर प्रत्यक्ष राजदरबारलाही अपवित्र करून बाटवीत आहेत. मात्र राजा बिज्जल याने अशा कोणत्याही तक्रारीला कधीच भीक घातली नाही. माणसांमधील जाती ईश्वराने निर्माण केल्या आहेत या वैदिक मताचे बसवण्णांनी खंडन केले. विशिष्ट व्यवसाय करण्याच्या पद्धती, प्रवृत्ती आणि परंपरेतून वेगवेगळ्या जाती उदयास आल्या. असा समाजशास्त्राचा व्यावसायिक सिद्धांत बसवण्णांनी मांडला. व्यवसायांमधील श्रेष्ठ-कनिष्ठता बसवण्णांनी मोडून काढली. सर्व प्रकारच्या श्रमांना सारखेच महत्व दिले. जातीय विषमता, श्रेष्ठ-कनिष्ठता किंवा भेदभाव कोणत्याच अर्थाने समर्थनीय नाही हे बसवण्णांनी ठामपणे मांडले. जातीय श्रेष्ठ-कनिष्ठता हे केवळ थोतांड असून अर्थहीन आहे, असे ते ठणकावून सांगतात. अशा तऱ्हेने निकोप सामाजिक अभिसरणासाठी बसवण्णांनी धर्मव्यवस्थेची आणि त्याअंतर्गत वर्णाश्रमाची सर्व प्रकारची बंधने झुगारून दिली.

**धार्मिक सुधारणा**

धार्मिक मतमतांतरांमध्ये गुरफटलेल्या सामान्य माणसास सोडवण्यासाठी त्यांनी निराकार आणि एकेश्वरोपासनेची शिकवण दिली. देवपूजा ही भाडोत्री पुजाऱ्याकडून करण्यापेक्षा आपण स्वतःच करणे योग्य होय, असे बसवण्णा म्हणत असत. महात्मा बसवण्णांनी मंदिर महात्म्य, मूर्तीपूजा आणि अनेकेश्वरवाद नाकारला. अंगावर नित्य धारण करावयाच्या 'इष्टलिंग' स्वरूपातच शिवोपासना पुरस्कारली. देव मंदिरात अथवा मूर्तीत असतो हे त्यांनी स्पष्टपणे नाकारले. अनेकेश्वरवाद आणि मंदिरांच्या फोलपणाविषयी बसवण्णांचे एक महत्त्वपूर्ण वचन आहे.

दगडाचा देव, देव नव्हे. मातीचा देव, देव नव्हे.
वृक्ष देव, देव नव्हे. धातूचा देव, देव नव्हे.
सेतुबंध रामेश्वर, काशी, गोकर्ण, केदार
अन् इतर क्षेत्राचा देव, देव नव्हे.
देव तुमच्या अंतर्यामी, आत्मदेव जाणणेचि थोर
हे कुडलसंगमेश्वर.

बसवण्णांनी इष्टलिंग दीक्षा सुरू केली. लिंगधारण करणाऱ्यांची पूर्वीची जात-पात नष्ट होते; त्यांची वेदांनी पुरस्कार केलेल्या यज्ञयागातून, पौरोहित्यातून, स्मार्त, अग्निहोत्र यांच्यातून मुक्तता होते. ब्राह्मण पुरोहितवर्गाचे शोषण कार्य, यज्ञविधीतील अपव्यय, सोवळ्याचा अतिरेक, बाह्य कर्मकांड, दुष्टाचरण यातून निर्माण झालेली मानसिक गुलामगिरी यांना बसवण्णांनी टीकाविषय बनविले. यज्ञयागातील निरर्थकता त्यांनी दाखवली ती अशी -

अग्नि देव म्हणून हवी देणाऱ्या
ब्राह्मणाच्या घरास आग लागताच
मोरीचे पाणी, रस्त्यावरील धूळ टाकून
बोंब मारीत सर्वांना हाका मारतात,
वंदन करणे सोडून अग्नीची निंदा करतात
कुडलसंगमदेवा.

त्या काळात ब्राह्मणांनी उच्चवर्णीय राजे, सरदार, जहागीरदार, वतनदार यांना मुठीत ठेवले होते. उच्चवर्णीयांनाच आपल्या मुठीत ठेवून सामान्यांना अनेक रूढी, परंपरा आणि कर्मकांडे यात अडकवले होते. मंदिर संस्था, यज्ञ, होमहवन, प्राणीबळी, सतीप्रथा, अनुष्ठाने, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, उपास तापास, उद्यापने, प्रायश्चितविधी अशा पुराणोक्त कर्मकांडांचा जबरदस्त प्रभाव होता. पोथ्यांच्या शेवटी लिहिलेल्या फलश्रुतीमुळे आणि इष्टकामनापूर्तीचे साधन म्हणून व्रताचरण यथासांग व विधिवत न केल्यास घातलेल्या भीतीमुळे शास्त्री, पंडित, पुरोहित यांचे उखळ पांढरे होई. परंतु बाकीचा सारा समाज मात्र देशोधडीला लागत होता. या अशा अंधश्रद्धांमुळे सर्वसामान्य समाजाचे शतकानुशतके अनेक प्रकारे शोषणच

होत राहिले. अशा साऱ्या कर्मकांडाविरुद्ध बसवण्णा आयुष्यभर प्रबोधन करीत राहिले. शरण चळवळीतील सर्वांना या चुकीच्या गोष्टी नाकारण्याचे धारिष्ट्य व निर्भयता प्राप्त होऊन त्यांची या गुलामगिरीतून मुक्तता झाली.

**कायक आणि दासोह : श्रमप्रतिष्ठा आणि संपत्तीचा विनियोग**

देव आणि मंदिर, देव आणि भक्त यांच्यातील पुरोहित, पुजारी नावाचा दलाल बसवण्णांनी नाकारला. अशा भाडोत्री पुजाऱ्याच्या पूजाव्यवहारातील फोलपणा, निरर्थकता त्यांनी स्पष्ट केली. या भाडोत्री पूजेतून होणारी उपजीविका बसवण्णांनी निंदनीय असल्याचे म्हटले. विविध कर्मकांडे आणि पूजाअर्चा यांच्या माध्यमातून समाजाचे शोषण करून त्यावर जगण्याचा त्यांनी धिःकार केला. कोणत्याही प्रकारच्या श्रमांची मूल्ये समान आहेत. त्यामुळे सर्व व्यवसाय समान आहेत. प्रत्येकाने विधायक श्रम करूनच आपली उपजीविका करणे यास त्यांनी 'कायक' म्हटले. राजा असो वा रंक प्रत्येक मनुष्याने विधायक कष्ट करूनच उपजीविका केली पाहिजे हे जीवनाचे तत्त्व म्हणून त्यांनी प्रतिपादिले. 'कायकवे कैलास' अर्थात शारीरिक कष्टातच परमार्थ. त्यास अनुसरून अनेक श्रीमंत आणि राजघराण्यातील व्यक्तीसुद्धा श्रमाची कामे करून आपली उपजीविका करू लागले.

पारंपारिक दान देण्यात दान देणारा नेहमी श्रेष्ठ आणि घेणारा नेहमीच कनिष्ठ समजला जातो. यामुळे दान देणाऱ्याच्या मनात अहंगंड तर दान घेणाऱ्याच्या मनात न्यूनगंडाची हीन भावना निर्माण होते. परंतु शरण चळवळीत सर्व समान असल्याने आपल्या बरोबरीच्या लोकांना मित्रत्वाने मदत करण्याच्या भावनेने जे दिले जाते त्यास बसवण्णांनी 'दासोह' म्हटले. दासोह म्हणजे पारंपारिक दानधर्म नाही तर गरजेपेक्षा अधिक संपत्ती संचय झाल्यानंतर उरलेले समाजास परत करण्याची ती एक कृतज्ञतेची भावना आहे.

**दिगंत कीर्ती**

आचार विचारांनी युक्त अशा शरण चळवळीचा बोलबाला सर्वत्र होऊ लागला. बसवकल्याणच्या प्रदेशात, संपूर्ण दक्षिण भारतात, संपूर्ण उत्तर भारतात बसवण्णांचा विचार जाऊन पोहोचला. या विचारांनी प्रभावित होऊन विविध प्रदेशातून अनेक जण बसवकल्याण येथील अनुभवमंटपाकडे येऊ लागले. बसवकल्याण हे क्रांतीचे केंद्र बनले. पूर्वाश्रमीचे मुसलमान असणारे मरूळशंकरदेव कल्याणमध्ये येऊन लिंगधारी शरण झाले. लिंगायत झाले. त्यांना शरणांनीच 'मरूळशंकरदेव' असे नाव दिले. राजदरबारात भांडी धुण्याचा कायक करून ते आपली उपजीविका करू लागले.

काश्मीर येथून राजा भूपाल महादेव आपल्या पत्नीसह कल्याणला आला. त्याने काश्मीरचे राज्य आपल्या मुलाला देऊन तो शरण झाला, लिंगधारी झाला. मोळीगे मारय्या आणि महादेवी ही नावे धारण करून काश्मीरचे राजा राणी बसवकल्याणमध्ये मोळी विकण्याचा कायक करू लागले. कष्ट करून जगू लागले.

**स्त्रियांची समानता**

जगाचा निम्मा भाग स्त्रियांनी व्यापलेला असताना जगातल्या सर्वच धर्मांनी स्त्रीला गौण मानले होते. विविध प्रकारच्या चुकीच्या प्रथा परंपरांमधून स्त्रियांच्यावर अनेक प्रकारची बंधने लादण्यात आली होती. बाराव्या शतकापर्यंत स्त्रियांच्या परवशतेत काहीच फरक पडला नव्हता. शूद्रापेक्षाही वाईट अशा प्रकारची स्थिती स्त्रियांच्या वाट्याला आली होती. अशा पार्श्वभूमीवर बसवण्णांनी शरण चळवळीच्या माध्यमातून धर्मग्रंथांनी लादलेली स्त्रियांवरची सर्व बंधने काढून टाकली. स्त्रियांचा आदर व सन्मान केला. स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य बहाल केले.

स्त्रियांच्या परावलंबित्वाचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे आर्थिक स्थैर्य. बसवण्णांनी अनुभव मंटपात स्त्रियांना व्यवसायिक शिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. एवढेच नव्हे तर त्या-त्या क्षेत्रात निपुण असणाऱ्या स्त्रियांची व्यवसाय शिक्षणावर नेमणूक केली. व्यवसाय शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनवून इतर स्त्रियांच्या समोर एक वेगळा आदर्श घालून दिला. बसवण्णांच्या अनुभव मंटपात शिक्षणाचे धडे गिरवत सत्तरहून अधिक स्त्रियांनी वचन साहित्याची निर्मिती केली. या सर्व स्त्रियांच्यामध्ये अक्कमहादेवी या अग्रस्थानी आहेत. या स्त्रियांनी अनेक विषयांवरती वचन साहित्याची निर्मिती केली. स्त्री-पुरुष भेदभाव, सदाचरण, नैतिकता आणि नीतीमूल्ये, मनोनिग्रह, व्रतनिष्ठा, व्यवसाय, आर्थिक विषमता, मानवताधर्म, दंभढोंग प्रवृत्ती अशा अनेक विषयांवरची या स्त्रियांची वचने पाहिल्यानंतर त्यांच्या चिंतन, मनन, अनुभव, अभ्यास या सर्व गोष्टींची प्रचिती येते.

विधवा पुनर्विवाहासाठी महात्मा बसवण्णांनी महत्त्वाची भूमिका घेतली. विधवांबरोबरच वेश्यांच्या पुनर्वसनासाठी बसवण्णांनी मोलाचे प्रयत्न केले. वेश्यांना वेश्या व्यवसायापासून मुक्त करून त्यांना अनुभव मंटपात उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करून दिले. वेश्यांची लग्नेही लावून दिली. विधवा पुनर्विवाह आणि वेश्यांच्या पुनर्वसनासाठी बसवण्णांनी केलेले प्रयत्न हे काळाच्या कितीतरी पुढचे होते. एकूणच, बाराव्या शतकात ज्यावेळी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात केवळ आणि केवळ अधःकार होता त्यावेळी अशा अनेक बाबतीत बसवण्णांनी घडवून आणलेली ही मोठी क्रांती होती.

(लेखक दे. आ. ब. नाईक महाविद्यालय चिखली येथे कार्यरत आहेत.)

●



# 'डाकीण'... संपता संपेना..!

विनायक सावळे
९४०३२५९२२६

डाकीण प्रथा संपुष्टात आणण्यासाठी हरतर्हेने, सातत्यपूर्ण प्रयत्न महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले आहेत. जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, विद्यापीठाचे कुलगुरू, जिल्ह्यातील सर्व प्रमुख संस्था संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत पूर्ण एका दिवसाची परिषद घेतली. त्या परिषदेत डाकीण प्रश्नावर सखोल चर्चा आणि प्रबोधन झाले. प्रत्येक गावात असलेल्या पोलीस पाटलांचे प्रशिक्षण झाले. प्रत्येक गावात असलेल्या अंगणवाडी सेविका, पाडा सेवक, आशा वर्कर, शिक्षक, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी या सगळ्यांचे प्रशिक्षण झाले. पोलिस पाटलांची तत्कालीन गृहराज्यमंत्री यांच्या उपस्थितीत 'डाकीण प्रथा विरोधी संकल्प परिषद' पार पडली. गावागावात प्रबोधनासाठी काढलेल्या अक्काराणी ते याहामोगी संवाद यात्रा, डाकीण ठरवत असलेल्या होर्‍यापाणीच्या चंपालाल महाराजाचा भांडाफोड, पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने पाड्यापाड्यावर प्रत्यक्ष प्रबोधनाचे कार्यक्रम, कितीतरी डाकिण पीडित महिलांना समोर आणून त्यांच्या व्यथा समाजासमोर आणल्या. त्याच्यावर एक पुस्तक काढले, ज्याला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार मिळाला. सर्व अधिकारी, राजकीय पुढारी यांच्याशी संवाद, त्यांच्या सहभागाने अनेक कार्यक्रम झाले. इतका विविधांगी प्रयत्न कदाचितच कोणी तरीच एखाद्या विषयावर सातत्याने केला असेल. इतके करूनही डाकिणीचा प्रश्न आपली क्रूरता जराही कमी करायला तयार नाही. डाकिणीचा प्रश्न संपता संपेना.

गेल्या आठवड्यात एका तरुण महिलेला निर्वस्त्र करून, एक जमाव तू कोणा-कोणाला खाल्लं? अजून कोण तुझ्यासोबत आहे? त्यांची नाव सांग, अशी विचारणा करीत महिलेला चटका देऊन छळ करत होता. त्याचा एक व्हिडिओ समाज माध्यमात व्हायरल झाला. यावर काम करणारे कार्यकर्ते, प्रशासन, पत्रकार सगळ्यांनाच हादरवून टाकणाऱ्या या व्हिडिओने डाकिण प्रश्नाचे आव्हान किती भयंकर आहे, याची परत जाणीव करून दिली.

२१ व्या शतकात ज्याला आपण विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणतो. अशा युगात आजही एखादी स्त्री डाकीण असते. ती माणसांना खाते ,मारून टाकते, प्राण्यांचा जीव घेते, पिकपेरा कमी करते, गाई म्हशीचे दूध आटवते, अपघात घडवते, आजारी पाडते, जंगली प्राण्यांच्या रूपाने हल्ला करते, असे भ्रम घेऊन जगणारी माणसे आजूबाजूला आहेत. या अघोरी अंधश्रद्धेतून कितीतरी महिलांना डाकीण ठरवून मारहाण करणं, गावातून हाकलून देणं, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणं, नग्न करून तिचा छळ करणं आणि प्रसंगी तिचा खुनच करणं, हे सारं काही आजही घडत आहे.

शिक्षण क्षेत्राने सांगितलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, भारताच्या संविधानाने कर्तव्य म्हणून सांगितलेला वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात पोहोचवायला आपण सारेच कमी पडलो आहोत. मोबाईलचा डाटा पोहोचला, रस्ते पोहचले, योजना पोहचल्या, विजेचे खांब पोहोचले, सौरदिवे पोहोचले, पाडे पाडे प्रकाशमय झाले, पण मनातील अंधश्रद्धांचा अंधःकार दूर करण्यासाठी विवेकाच्या प्रकाशाची साधी एक तिरीपही तिथे पोहोचली नाही. हे सारं मन विषन्न करणार आहे.

शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर म्हणून म्हणत होते की, ही शतकांची लढाई आहे. ती अधिक निकराने लढावी लागणार आहे. ती केवळ महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने लढून भागणार नाही तर, येथील राजकीय पुढारी, प्रशासन, शिक्षण संस्था, माध्यमे, विविध संस्था-संघटना, या सर्वांनी मिळून लढायची आहे. पोलीस प्रशासनाची यात जबाबदारी मोठी आहे. पोलीस पाटलांच्या माध्यमातून त्यांचा सर्व गावांची थेट संबंध येतो. जादूटोणाविरोधी कायदासारखा एक कायदा शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांच्या बलिदानाने तयार झालेला आहे. या कायद्याचा धाक देखील पाड्यापाड्यावर पोहोचण्याची गरज आहे.

स्त्री ही सर्जनशीलतेचा आविष्कार असते. ती जन्म देणारी असते. जीव घेणारी नाही. मंत्रतंत्र, जादूटोणा जगात अस्तित्वात नाही. कोणत्याही घटनेमागे काहीतरी कार्यकारणभाव असतो. हे विज्ञानाचं पायाभूत तत्त्व पोहचण्यासाठी सर्व माध्यमांना पुन्हा नव्याने प्रयत्न करावे लागतील. आधीच्या आपल्या प्रयत्नात काय उणीवा राहिल्या, त्याचा अभ्यास करावा लागेल, प्रबोधनाची धार कमी होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. पीडित समाज घटकातूनच प्रबोधनाचा आवाज उभा राहील, यासाठी प्रयत्न केल्यास विवेकाच्या प्रकाशाची तिरीप आपण नक्कीच पाड्यापाड्यापर्यंत पोहोचू शकू, असा विश्वास वाटतो. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जमेल ती भूमिका पार पाडायला हवी. ज्याला याविरोधात बोलणं शक्य त्याने बोलावं, ज्याला संघटित कामात सहभागी व्हायचे असेल त्यांनी संघटनेत सहभागी व्हावे, एखाद्याने पीडित महिलेला मदत करावी, एखाद्याने याबाबत लिहावं, अशा सगळ्या मार्गाने कृतिशील राहून स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळेल यासाठी प्रयत्न करूया.

( लेखक, महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)

●



# तोडूया जाती-धर्माच्या बेड्या



ॲड. मनीषा महाजन
९४२२३०८७८०

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नेहमीच आंतरजातीय, आंतरधर्मीय आणि आंतरराष्ट्रीय विवाह व्हावेत यासाठी प्रयत्नशील असते. तसेच जोडीदाराची विवेकी निवड करून विवाह करण्याबाबत आग्रही भूमिका मांडत असते. जातींची निर्मिती ही वर्चस्ववाद व वर्णव्यवस्था रुजवू पाहाणाऱ्या समाजाकडून झालेली आहे. शिवाय जात मानणे ही देखील एक अंधश्रद्धाच आहे. मनुस्मृतीनुसार जातीची उतरंड आणि निर्मिती झालेली आहे, ज्याला कुठलाही वैज्ञानिक आधार व पुरावा नाही.

विवेकी विचार करण्याची शिकवण व दृष्टिकोन गौतम बुद्धांनी दिला. चार्वाकांनी चिकित्सेचे महत्त्व विशद केले. महात्मा बसवण्णांनी बाराव्या शतकात सर्व माणसे समान आहेत हा संदेश देऊन अठरापगड जातीतल्या सर्व लोकांना सोबत घेऊन, उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य हा भेद मिटविण्यासाठी व महिलांना समान हक्क मिळावा म्हणून स्वतंत्र अशी लिंगायत पंथाची (धर्माची) स्थापना केली. त्याकाळात बसवण्णांनी एका जोडप्याचे, जन्माने ब्राह्मण जातीची मुलगी कल्याणी व जन्माने चांभार व अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतला हरळय्या यांचे आंतरजातीय लग्न लावले होते. नंतरच्या काळात कबीरांनी समाज परिवर्तनाचे दोहे रचले. छत्रपती शिवाजी महाराज यांनीसुद्धा अठरापगड जातीतल्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्य निर्मितीचे काम केले. त्याच दरम्यान तुकाराम महाराजांनी सुद्धा समाजात असलेले अनिष्ट रूढी, परंपरा आणि जातिभेद नष्ट होऊन एकसंध समाज निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न केले. वर्णावर्ण भेद जो करत नाही तोच खरा समर्थ आणि भेदाभेद अमंगळ असा दृष्टिकोन व विचार मांडणारे तुकाराम महाराज आजही समाजाला दिशादर्शक आहेत. त्यानंतरच्या काळात अनेक समाजसुधारकांनी व संतांनी समाजामधील जातिभेद, अस्पृश्यता व वर्णव्यवस्था नष्ट करण्यासाठी व प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जन्मजात मानवी हक्कासहित मानाने व सन्मानाने जगता यावे यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

शाहू महाराजांनी वर्णभेद व जातिभेद नष्ट करण्यासाठी रोटी-बेटी बंदी उठवण्यासाठी, तसेच समता प्रस्थापित करण्यासाठी सर्व जातीतल्या लोकांसोबत जेवण केले व आरक्षणाचे बीज रोवले. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी अनेक अनिष्ट रूढी, परंपरांना फाटा दिला. स्त्री शिक्षणाची वाट मोकळी केली. सत्यशोधक समाजाची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात समता, बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावे यासाठी मूलभूत हक्क अंतर्भूत केले. महिलांना समान हक्क मिळवून दिले.

एवढी प्रगल्भ सामाजिक पार्श्वभूमी असतानादेखील आजही महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, भेदभाव कमी होताना दिसून येत नाही. शिक्षणामुळे माणूस केवळ साक्षर झाला. उच्च शिक्षण घेऊन आर्थिक परिस्थितीत सुधारणा करून घेऊ शकला. मात्र वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करून घेऊ शकला नाही. तसेच समाजाचा एकंदरीत स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रगल्भ झाला नाही. कायद्याने मुलींना वडिलांच्या मिळकतीमध्ये समान हिस्सा असतानादेखील तिला डावलले जाते. आजच्या काळात देखील मुलगी जन्माला आली की, आई-वडिलांच्या चिंतेमध्ये वाढ होते. तिचे पालनपोषण शिक्षण व लग्न यासाठी पैशांची व्यवस्था आजही मुलींच्या आई-वडिलांना करावी लागते. त्यातच हुंडा, मानपान, खूप मोठे खर्च करून थाटामाटात लग्न लावून देणे इत्यादी सर्व जबाबदारी मुलीच्या आई-वडिलांवरच असते. त्यामुळे कर्ज करून किंवा वेळ आली तर जमीन जायदाद विकून भागवावे लागते. कितीही शिकलेली मुलगी असली, कमावती असली तरीही मुलीच्या आई-वडिलांनाच लग्नाच्यावेळी खर्चाचा बोजा उचलावा लागतो. त्यामुळे कमी खर्चात लग्न करणे पचनी पडणारे नसते. समाज काय म्हणेल या भीतीने, परिस्थिती नसताना देखील हा बोजा उचलावा लागतो. विवेकी विचार करून, कमी खर्चात रजिस्टर लग्न किंवा महात्मा फुले यांनी सांगितलेल्या सत्यशोधक पद्धतीच्या लग्नाचा पर्याय समाजाने स्वीकारल्यास अनावश्यक खर्च वाचवता येईल. तसेच विवेकी विचार समाजात रुजविता येईल म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अशा लग्न पद्धतीचा पुरस्कार करते.

आजही समाजात जातिव्यवस्थेची पकड माणसांच्या मनात घट्टपणे रूतून बसलेली आहे, त्यामुळे प्रत्येक माणसाचा सामाजिक व्यवहार व देवाणघेवाण हे जाती आधारित असते. आज एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की, माणूस या आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय जगू शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तंत्रज्ञान हेच सर्वोच्च आधुनिक जगण्याचा आधार असल्याबाबत त्याची खात्री होत चाललेली आहे. त्यामुळे माणसाचे मन हे असंवेदनशील होत चालले आहे. त्याचाच गैरफायदा घेऊन काही समाजकंटक

समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करतात आणि चुकीच्या गोष्टी, तंत्रज्ञानाचा व समाज माध्यमांचा वापर करून त्यात यशस्वी देखील होतात.

त्याचा प्रत्यय आजही आपल्याला आलेला दिसून येतो. त्यामध्ये आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना समाजमाध्यमातून त्रास दिला जातो. ट्रोल केले जाते. बऱ्याच वेळा विवाह नोंदणी कार्यालयात हिंदू–मुस्लिम मुला–मुलींनी नोटिस फॉर्म भरला असेल, तर त्याची माहिती घेऊन असे कट्टरपंथीय समाजकंटक त्यांना कुठलाही अधिकार नसताना मुला–मुलींच्या घरी परस्पर फोन अथवा प्रत्यक्ष भेट घेऊन दहशत निर्माण करून वातावरण बिघडविण्याचे काम करतात. खरेतर जाती–धर्माच्या पलीकडे जाऊन एक माणूस म्हणून अशी जोडपी एकमेकांचा स्वीकार करण्यास तयार असतात. याचाच अर्थ असा होतो की, ही जोडपी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार अंगीकार करण्यात यशस्वी झालेली असतात. परंतु त्यांना हवा असलेला मानसिक व सामाजिक आधार कुटुंबीयांकडून मिळत नाही. म्हणून, असे अनेक विवाह होऊ शकत नाहीत. त्यागाच्या नावाखाली व समाज काय म्हणेल या भीतीने अशा अनेक विवाहेच्छुक जोडप्यांना धाडस करून विवाहबद्ध होता येत नाही व स्वत:चा जोडीदार विवेकाने निवडता येत नाही. त्यामुळे आयुष्यभर मन मारून नको असलेली तडजोड करून जगावं लागतं.

लग्नसंबंधात जातीची पकड इतकी घट्ट असते की, वधू–वर जातीतलेच पाहिले जातात. मुलगा असो वा मुलगी, लग्न आई–वडिलांच्या इच्छेप्रमाणे जातीतच केले पाहिजे, असे सामाजिक बंधन असते. जोडीदाराची निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांना नसते. ऑनर किलिंगच्या नावाखाली जातीय मानसिकता अशा वेळेस मुला–मुलींचे जगणे मुश्कील करते. त्यांना स्वतःच्या इच्छेनुसार निवडलेल्या जोडीदारासोबतचे जगणे अवघड करते. जातीपातीच्या बेड्या तोडून विवेकी जोडीदार निवडण्याचा पर्याय महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सातत्याने मांडत असते. तसेच आंतरजातीय व आंतरधर्मीय लग्न व्हावे यासाठी समाजामध्ये सतत प्रबोधन करत असते. जातीधर्माच्या बेड्या तोडून जोडीदार निवडण्याचा परीघ वृद्धिंगत केल्यास समाजामध्ये सामाजिक ऐक्य, बंधुभाव व सद्‌भावना वाढीस लागेल. तसेच सामाजिक तेढ कमी होऊन एक कल्याणकारी समाज निर्माण होण्याकडे वाटचाल करता येईल, जी अपेक्षा व स्वप्ने आपल्या भारतीय संविधानाची आहेत. विवेक जागृत ठेवून अनेक अनिष्ट रूढी, परंपरा यांची जळमटं काढून, मानवतावादी दृष्टिकोन आत्मसात करून समाजाची उन्नती व विकास साधता येईल. अनेक जोडप्यांनी नको असलेल्या जातीच्या व धर्माच्या बेड्या तोडून, सद्‌सद्‌विवेकबुद्धीने जोडीदाराची निवड केली आहे आणि ते खूप चांगल्या पद्धतीने, गुण्यागोविंदाने संसाराची वेल फुलवत आहेत. अनेक विवाहांना सुरुवातीच्या काळात विरोध पत्करावा लागला, परंतु कालांतराने कुटुंबाने व समाजाने त्यांना मान्यता दिली. अशी अनेक आदर्श जोडपी समाजात अनुकरणीय ठरली आहेत. त्यामुळे जातीधर्माच्या बेड्या तोडणे अजिबात अवघड नाही. चला तर मग, अशा जाती–धर्माच्या बेड्या तोडून आपला सामाजिक परीघ वाढवूया.

(लेखिका महा. अंनिसच्या कायदा व्यवस्थापन विभागाच्या कार्यवाह आहेत.)

●

## चमत्कार सादरीकरणातून कार्यकर्त्यांना धडे

**गडचिरोली :** महाराष्ट्र अंनिसच्या गडचिरोली शाखेचे बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह प्रशांत नैताम यांनी युवकांना व चळवळीतील कार्यकर्त्यांना चमत्काराचे प्रात्याक्षिक सादरीकरण करता यावे म्हणून प्रशिक्षणाचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी महाअंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुरुषोत्तम ठाकरे, गोविंदराव ब्राम्हणवाडे उपस्थित होते. नैताम यांनी काही प्रात्याक्षिके करून दाखवली व प्रशिक्षणासाठी आलेल्या युवकांकडून सुद्धा प्रत्यक्षात चमत्काराचे धडे गिरवून घेण्यात आले. या संधीचा फायदा बऱ्याच युवकांनी व जुन्या कार्यकर्त्यांनी सुद्धा घेतला. कार्यक्रमाची सुरुवात चला गड्यांनो पाऊल टाकू पुढं रं, उखळून टाकू अंधश्रद्धेची मूळं रं या गीताने करण्यात आली. प्रशांत नैताम, विलास निंबोरकर, श्री पुरुषोत्तम ठाकरे, अरुण भोसले, विठ्ठलराव कोठारे, यांनी देखील प्रात्याक्षिके सादरीकरण केले. कोठारे यांनी प्रास्ताविक केले. संचलन विलास निंबोरकर यांनी केले. आभारप्रदर्शन गोविंदराव ब्राम्हणवाडे यांनी केले. या संधीचा लाभ घेण्यासाठी कुसुमताई अलाम, मुकुंदराव महादेव मेश्राम, वर्षा अरविंद राजगडे, आशिष जोंधरू वैरागडे, संजना शेषराव येलेकर, दिक्षा अनिल तेल्कापल्लीवार, अंनिस भोसले, अश्वीनी भारत धोडरे, अजय कैलास उंदिरवाडे, प्र. म. कुलसंगे आदी उपस्थित होते.

### विचारधन

परिस्थितीच्या मर्यादेत प्रामाणिकपणे, धैर्याने, माणूसकीने त्यांना सामोरे जाणे आणि त्यावर उत्तर शोधणे, यातच खरी माणूसपणाची कसोटी आहे. हे सामर्थ्य देण्याचे सर्वात प्रभावी ऊर्जाकेंद्र म्हणून कुटुंबातील वातावरण बदलणे, सजग व सक्रिय करणे, हाच कुटुंबातील अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रभावी मार्ग आहे.

• – शहीद डॉ. नरेंद्र



# आनंदाचा शोध

डॉ. प्रदीप पाटकर
९८६९४७२२१५

रोज क्लिनिकला जाताना दरवाजापाशी थोडा थबकतो. सहज लक्ष जाते, शेजारच्या बंगल्यातील बागेत उभ्या असणाऱ्या पारिजातकाच्या झाडाशी. कंपाऊंडच्या माझ्या बाजूच्या जमिनीवर पारिजातकाने ढाळलेली फुले अश्रूंसारखी विखुरलेली असतात. अश्रू यासाठी म्हणायचे कारण ती फुले चांदण्यांसारखी चमकताना काल रात्रीच मी पाहिली होती. हल्ली रोज रात्री गच्चीवर शतपावली करताना त्या कोपऱ्यापाशी पारिजाताने गंधसौंदर्याचा उत्सव मांडलेला असतो. मैफिलीत सारंगीने स्वरांना साथ द्यावी तशी पारिजाताच्या या गंध सौंदर्याच्या उधळणीला खाली रातराणी साथ देत असते. सद्गदित होऊन जात. मन निसर्गाच्या ह्या उदार भेटीने! सकाळी मात्र मी निघतो तेंव्हा ही फुले व रातराणीच्या कळ्या खाली विखुरलेल्या असतात. गंध अजूनही टिकून असतो पण चैतन्य हरवलेले असते. ही फुले, या कळ्या आज यानंतर ओ. पी. डी. त मी पाहणार असलेल्या माणसांच्या मनांसारख्या वाटू लागतात.

अध्यात्म (अधि+आत्मनः) हा आत्म्याचा शोध खरेतर आनंदाचा शोध असतो. अनेकांकडून तो दुःखावरचा उतारा म्हणून वापरला जातो. माणसाला जगण्यात सापडू शकेल अशा अनेक सहजसुलभ अलौकिक, अपरिमित आनंदाची चुणूक निसर्ग सतत देत असतो. लहान मूल असताना आपण त्या आनंदाशी ओळख करून घेतलेली असते. मनातल्या त्या विलक्षण जादुमय स्वप्ननगरीत आपल्याला चहुबाजूने आनंदाची चाहूल जाणवत असते. तेव्हा मन छोट्याशा गोष्टींमध्ये भरभरून आनंद घेत असते. मोठे होता होता आपले अध्यात्म, आपला आनंदाचा शोध थांबत जातो आणि स्वप्नरात्रीत फुललेला नक्षत्रवृक्ष सकाळी रुक्ष होत जातो. अपेक्षा वाढत जाऊन वास्तवावर अपेक्षाभंगांचे मळभ दिवसेंदिवस दाटत जाते. चिकित्सा हवी, पण अतिचिकित्सा माणसांना रुक्ष करीत जाते की काय? कार्यकारणभावासोबत वस्तुनिष्ठ होकारात्मक दृष्टीकोनाचे असणे म्हणून जरुरीचे असते, नेमके तेच होत नाही.

साध्या सरळ जगण्याचे जर असे होत असेल तर मानसिक दुःखाने पीडित मनोविकारग्रस्त मनांचे काय व्हायचे? जिवंतपणी भूते झालेल्या, फुटलेल्या आरशातील छिन्न-विछिन्न प्रतिमांना कसेबसे जोडून त्यात आपला चेहरा शोधण्याच्या प्रयत्नात वैतागलेल्या मनांना कसे सांभाळायचे? सुख,आनंद तर दूरच, स्वप्नांचे तडकणे, दुःखांचा सल कसा कमी करायचा? दुःख निर्मितीत दैव, देवाची अवकृपा, वाईट नशीब आदि कल्पना माणसांचा हात धरू शकत नाहीत, असे देव मानणारेही मान्य करतील. त्यात आपल्या अस्तित्वाचा पुरावा माणसांच्या विश्वात चुकूनही कुठे रहाणार नाही, याची केवढी तरी दक्षता देवाने घेतली असावी!! अन्यथा देवापाठी आस्तिकांची एवढी धावपळ होण्याचे कारणच नाही. मानवाच्या बऱ्याचशा सुख-दुःखांमागे त्याचे स्वतःशी, इतरांशी, सृष्टीशी असलेले व्यवहार कारणीभूत असतात, हे तर कुणाच्याही सजग, सज्ञान मनाला कळू शकेल. प्रत्येक नव्या शोधाबरोबर विज्ञानाने हे सत्य आपल्यासमोर सिद्ध केले आहे. आपल्या जाणिवांच्या पिसाऱ्यात अवास्तव महत्त्वाकांक्षा, अगणित लोभ-मोह-मत्सर, अतृप्त वासना, संकुचित मानस आकृतिबंध, अवैज्ञानिक पूर्वग्रह, अविकसित जाणिवा, पारंपारिक प्रतिगामी संकल्पना यांची पिसेच फार! व्यावहारिक प्रश्नांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, परस्पर व्यवहारात उत्तरे शोधायची ते सोडून, दैवाला, नशिबाला, भटकत्या तथाकथित आत्म्यांना, जगन्नियंत्याला खूष करण्यासाठी तंत्रमंत्र, जपजाप्य, कर्मकांडे, कठोर उपासना, अघोरी कृत्ये, आत्मपीडनाचे विविध मार्ग अशा पळवाटा शोधण्यात (व त्या दाखवून देणाऱ्यांच्यामागे धावण्यात) गुंतायचे कशासाठी? व्यवहार विवेकनिष्ठ करणे कठीण का जावे? जीवनात सुख-दुःख, जय-पराजय, यश-अपयश दोन्ही असणार,त्यापासून कुणाचीच सुटका नाही. आज वाटलेले सुख केव्हा दुःखात बदलेल काही सांगतायेत नाही. अडचणी आल्या की काही काळ नाराज होणे स्वीकारून, त्वरेने समस्यापूर्तींचा शोध घेणे श्रेयस्कर असताना, हातपाय गाळून का बसायचे?

काही माणसे जीवनालाच नाकारून पारलौकिकाची वाट धरताना दिसतात. आपापसात घडलेल्या घटनांचा अर्थ लावायला प्रज्ञा वापरावी लागते. पण त्या त्या क्षणी तात्पुरत्या उचंबळलेल्या भावनांनाच घट्ट पकडून माणसे नंतर आयुष्यभर एकमेकांवर प्रेम करू लागतात वा एकमेकांशी वैर धरतात. भूतकाळातील घटनांना, उद्गारांना, कृतींना घट्ट चिकटून राहतात. वर्तमानात आपल्या शरीरातील अगणित पेशी रोज मरत असतात, नव्याने जन्म घेत असतात. म्हणजे जवळजवळ दर क्षणाला जुनी कात टाकून ही सृष्टी व त्यातले आपण नवे होत असतो. नव्याचा आनंद लुटण्यासाठी आपल्यातल्या व जगातल्या सततच्या नवनिर्मितीच्या उत्सवाकडे लक्ष द्यायचे असते. ते दुर्लक्षून,जुन्याच घटनांना, विचारांना चिकटून राहायचे, पूर्वग्रहांना टाकून द्यायचे नाही, संचिताची कुरूपता तेवढी न्याहाळत राहायचे, तर जगण्यातला आनंद मिळणार कसा? सुखसंवेदना जन्मणार कशा?(क्रमशः)

(लेखक, प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ, जेष्ठ कार्यकर्ते आहेत.)



# खरंच तारा तुटतो का?

शंकर शेलार
९६५७८८७५३२

एका हिंदी सिनेमाच्या कथेतील प्रियकर आणि प्रेयसी अंधाऱ्या रात्री मोकळ्या मैदानावर गप्पा मारत बसलेले असतात. भावी आयुष्याची सुखकर स्वप्ने रंगविण्यात दोघेही गर्क असतात. तेवढ्यात, अचानक आकाशात झमकन एक तारा निखळतो आणि क्षणार्धात लोप पावतो. सिनेमाच्या कथेतील नायक अत्यंत चाणाक्ष असल्याने तो ही घटना पाहात असताना पटकन जमिनीवरील एक खडा उचलतो. घट्ट आवळलेली मूठ मैत्रिणीसमोर धरून अत्यंत हर्षोल्हासाने तिला सांगतो, 'प्रिये, आपण पाहात असलेली सर्व स्वप्ने पूर्ण होणार!' सिनेमातील हा प्रसंग आपल्या मनात काही प्रश्न जरूर निर्माण करतो. आकाशात तारा खरंच तुटतो का? आपली मनोकामना (मन्नत) पूर्ण होते का? या शंकांचे निरसन करण्यासाठी हा खगोलीय अविष्कार का होतो आणि कसा होतो हे समजून घेऊया.

तारा निखळणे अर्थात Shooting Star या अविष्कारामध्ये छोटे मोठे दगड सहभाग घेतात. आपल्या सूर्यमालेत मंगळ व गुरु ग्रहाच्या दरम्यान लघुग्रहांचा पट्टा आहे. त्यामध्ये धुलीकणांपासून ते १००० किलोमीटर आकाराचे लहान मोठे दगडधोंडे आहेत. यापैकी मिलीमीटर ते १०० मीटरपर्यंत आकाराच्या दगडांना अशनी (Meteorite) तर त्यापेक्षा मोठ्या खडकांना लघुग्रह (Asteroid) म्हणतात. यातील लहान दगड पृथ्वीजवळ येत असतात. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे ते पृथ्वीच्या वातावरणात ओढले जातात. वातावरणाबरोबर त्यांचे घर्षण होते. या घर्षणाने सदर दगड तापतात आणि पेटतात. जोंधळ्याच्या आकाराचा छोटासा दगड एक तेजस्वी प्रकाश शलाका निर्माण करतो आणि क्षणार्धात जळून नष्ट होतो. काही वेळा हे दगड (पुरेसे मोठे असतील तर) जमिनीवर पडतात. खगोलीय घटनांबद्दलच्या अज्ञानामुळे आपण या अविष्कारास 'तारा निखळला' किंवा 'तारा तुटला' असे म्हणतो.


अशनींचा अभ्यास करून खगोल वैज्ञानिक सदर अशनीचे वय ठरवतात आणि पर्यायाने पृथ्वीचे वयही निश्चित करता येते. आपल्याकडे येणारे हे अंतळातील पाहुणे आकाराने फारच मोठे (५०/१००मीटर) असतील तर मात्र पृथ्वीवरील जीवसृष्टीला ते मारक ठरतात. बुलढाणा जिल्ह्यातील लोणारचे सरोवर यातूनच निर्माण झालेले आहे. साडेसहा कोटी वर्षांपूर्वी अशाच एका आघातात महाकाय असे डायनासोर नष्ट झालेले आहेत. यदाकदाचित एखादा लघुग्रह पृथ्वीच्या भेटीस आला तर आपणाला जरूर विचार करावा लागेल.

छोट्या मोठ्या दगडधोंड्यांनी आपले अस्तित्व धोक्यात येत असेल, तर ताऱ्यांच्या तुटण्याची कल्पनाच न केलेली बरी. तारे कधीही तुटत नाहीत, त्यामुळे मनोकामना पूर्ण व्हायचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ताऱ्यांचे आयुष्य अब्जावधी वर्षांचे असते. व्यास लाखो किलोमीटर तर वस्तुमान हजारो अब्ज किलोग्रॅम असते. तारे तुटत नाहीत आणि निखळंतही नाहीत. सूर्यासारखे तारे शेवटी पृथ्वीच्या आकाराचे 'श्वेतबटू' बनतात, तर सूर्याच्या वस्तुमानाच्या पाच-सहा पटीपेक्षा मोठाल्या ताऱ्यांचा शेवट मात्र विदारक पद्धतीने प्रचंड स्फोटात (Supernova) होतो आपल्या आकाशगंगेत शतकात असे २-३ स्फोट होत असतात.


(लेखक खगोल अभ्यासक आहेत.)

●

## 'विद्रोही'चा माधव बावगे यांना जीवनगौरव



**उदगीर :** २३ आणि २४ एप्रिल रोजी उदगीर येथे होणाऱ्या १६ व्या विद्रोही साहित्य संमेलनात चार महनीय व्यक्तींचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्रत्येक संमेलनात जिल्ह्यातील आपापल्या क्षेत्रातील विशेष उल्लेखनिय कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. यंदाच्या विद्रोही साहित्य संमेलनात महाराष्ट्र अंनिसचे प्रधान सचिव माधव बावगे, सामाजिक कार्यकर्ते रंगा रचूरे, प्राचार्य नागोराव कुंभार, पत्रकार रामराव गवळी यांना जीवगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी कळविले आहे.



# कपिले बाबाची भोंदूगिरी

माधव बावगे
९४०४८७०४३५

पुसद (जि. यवतमाळ) येथील विश्वजीत रामचंद्र कपिले उर्फ कपिलेबाबा आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी बुवाबाजी करून, अलौकिक दैवी शक्ती, जादूटोणा व तंत्र–मंत्राचे भय दाखवून प्रचंड आर्थिक लूट, मानसिक, शारीरिक छळ केला आणि आता जिवे मारण्याची धमकी देत असल्याचा आरोप दोन उच्चशिक्षित तरुणांनी केला आहे. या भोंदूबाबावर कठोर, कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी माहूरगड, जिल्हा नांदेड पोलिसांकडे केलेली आहे. मनाला अस्वस्थ करून टाकणाऱ्या घटनेचा तपशील पुढीलप्रमाणे–

प्रवीण सारनिकर आणि उद्धव मानेसे (दोघा पीडितांची नावे बदलली आहेत) हे तरुण मुंबईमध्ये खाजगी कंपनीत नोकरी करीत होते. तिथे ऑफिस स्टाफमध्ये योगेश भालेराव हा सहकारीही काम करीत होता. प्रवीण सारनिकर यास 'स्टील्स डिसीज' हा दुर्धर आणि दुर्मीळ आजार झाला होता. या आजारावर उपाय सुचवताना, योगेश भालेराव याने सारनिकर याला त्याच्या गावाकडील विश्वजीत रामचंद्र कपिले याची आयुर्वेदिक वैद्य म्हणून, मुंबई येथील एका उच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्याच्या घरी, डिसेंबर २०१३ च्या अखेरीस ओळख करून दिली. तसेच 'हा अतिदुर्धर आजाराने पीडित आहे, त्याला तुमचा दैवी उपचार हवा आहे', असे कपिले बाबा यास सांगितले. त्यावर, कपिले बाबाने प्रवीणला त्याच्या मूळ गावी, पुसद येथे बोलाविले. त्यानुसार प्रवीण आणि योगेश फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पुसद येथे या कपिले बाबाच्या घरी गेले. त्याने प्रवीणची तपासणी केली आणि 'तुला कडक अशा बाहेरच्या बाधेचा त्रास आहे. तुझी बाहेरची बाधा काढल्यानंतरच औषध उपचार लागू पडतील', असे सांगितले. बाबा त्याला महाशिवरात्रीनिमित्त माहूर येथे घेऊन गेला. तिथे हवनविधी केला. हवनविधी चालू असताना, कपिले बाबाच्या अंगात दत्तशक्तीचा संचार झाला. त्या अवस्थेत कपिले बाबाने प्रवीणला सांगितले की, 'तुझ्यावर अघोरी, बाहेरची बाधा, तंत्रविद्येचा प्रयोग झाला असल्यामुळे तू आजारी आहेस. हे अमूल्य जीवन तुझे नसून दत्त महाराजांनी तुला दिलेले वरदान आहे. माझ्या अलौकिक दैवी शक्तीच्या जोरावर विशिष्ट विधी करून तुझ्यावर झालेली ही बाहेरची बाधा मी दूर करतो. विधीचा खर्च मात्र ११००० रु. येईल.' दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या पीडित प्रवीण याने आजार बरा होईल या आशेने माहूर येथे कपिले बाबाला रु.११००० रोख रक्कम देऊन विधी पूर्ण करून घेतला. विधीमध्ये त्यांनी भारलेली जडीबुटी औषधे म्हणून दिली. मंतरलेले पाणी प्यायला दिले. ते पाणी प्यायल्यानंतर थोड्या वेळाने प्रवीणच्या अंगात काहीतरी संचारल्यासारखे वाटू लागले. त्याला स्वतःचे भानच राहिले नाही. काही वेळाने भानावर आल्यानंतर बाबांनी उतारे केले. गळ्यात व दंडाला बांधायला गंडेदोरे दिले आणि विविध प्रकारची जडीबुटी दिली. 'तुला या जर्जर आजारातून पूर्ण मुक्त होण्यासाठी माझ्याकडे आश्रमात वारंवार यावेच लागेल', अशी ताकीद दिली. आणि यानंतर सुरू झाली एक अशी शृंखला, ज्यामध्ये कपिले बाबा प्रवीण यास त्याला झालेल्या बाधेची वेळोवेळी भीती घालत राहायचा आणि आपल्या दैवीशक्तीने त्याला बरे करण्याची आशा दाखवून आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शोषण करायचा.

कपिले बाबाने पुढील भेटीसाठी डिसेंबर २०१४ मध्ये दत्त जयंती निमित्त प्रवीण कडून माहूर विशेष तलाव येथे दुसऱ्या विधीसाठी २१००० रुपये रोख घेतले. तिथे प्रवीण यास अन्य विधीसाठी सात दिवस बाबाच्या सांगण्यावरून राहावे लागले. नंतर काही दिवसांनी योगेश मुंबईला परत गेला. या काळात रोज दिवसरात्र हवन चालू होते. हवनामध्ये, मंतरलेले पाणी पीडितांना प्यायला द्यायचा आणि विशिष्ट असा शक्तिपात दिला जायचा. त्याचा परिणाम होऊन सुमारे तीन दिवस पीडित ग्लानीत जात होता. पीडित कपिले बाबाला सांगायचा, 'मला कसलेही भान राहात नाही, संवेदना पण होत नाहीत.' त्यावर कपिले बाबा सांगायचा, 'तुला शक्तीचा स्पर्श झाला आहे. त्यामुळे हे असे होत राहील.' हवन करताना कपिले बाबा अंगामध्ये दत्तशक्तींचा संचार झाल्याचे नाटक करायचा आणि त्या अवस्थेत तो सांगायचा, 'गुरुसेवेमुळे अनंत जन्माचे पाप, पीडा नाहीशा होतात' आणि भीती दाखवायचा की, 'तुला शक्तिपात दिला आहे, तू जर मंत्रसाधना केली नाही, तर पुन्हा पहिल्यासारखा आजारी पडशील. तसे होऊ नये म्हणून तुला इकडे माझ्याकडे वारंवार वाऱ्या कराव्याच लागतील.' त्यानंतर दरवर्षी, वर्षातील विविध कार्यक्रमांसाठी पीडितांना माहूर (विष्णू कवी मठ परिसर) येथे भोंदू कपिले बाबा बोलवायचा. तिथे कपिले बाबा आणि त्याचे बुवाबाजीत साथ देणारे कुटुंबीय हवनामध्ये सहभागी होत असत. हवनामध्ये कधी बाबाचा भाऊ रवी कपिले, कैलास कपिले तसेच सारिका रवी कपिले, बाबाची बहीण नंदा यांच्या शरीरात दैवीशक्तीचा संचार होत

असल्याचे दाखवायचे. प्रवीणला आजार बरा करण्यासाठी या प्रसंगी कपिले बाबा अन्नदान करण्यासाठी प्रवृत्त करीत होता आणि हे सर्व, प्रवीण, पुन्हा आजारी पडायच्या भीतीने, कपिले बाबा सांगेल तसे पूर्ण करीत होता. माझ्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर देवाचा कोप होईल, अशी भीती कपिले बाबा आणि त्याचे साथीदार वेळोवेळी दाखवायचे आणि त्याला पीडित बळी पडायचे.

दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी महाशिवरात्रीनिमित्त माहूर येथे हवनावर बसल्यावर, बाबाचा भाऊ रवी कपिले याने प्रवीणला गाणगापूरला जाऊन हवन आणि अन्नदान करावे लागेल असे सांगितले. कपिले बाबाच्या कारमधून प्रवीणच्या संपूर्ण खर्चाने कपिले बाबा, रवी कपिले, सारिका कपिले, बाबाचा अजून एक शिष्य यांनी गाणगापूरला जाऊन अन्नदान केले. तिथे पुन्हा नदीपात्रात हवन केले. त्यावेळी रवी कपिले याच्या अंगात जणू दत्तगुरूंचा संचार झाला. त्या स्थितीत त्याने, 'पूर्णपणे चालत माहूर ते बद्रिकाश्रम अशी यात्रा केवळ भिक्षा मागत संन्याश्याप्रमाणे करावी लागेल', असे प्रवीण यास सांगितले. सोबत, रवी कपिले, कैलास कपिले, पुसद येथील आणखी एक शिष्य अनिल यांना येण्याचा आदेश दिला. 'आदेश पूर्ण केला नाही तर, देवाचा कोप होईल, तू पुन्हा आजारी पडशील', अशी भीती पीडित प्रवीणला दाखवली. यात्रेमध्ये असताना कपिले बाबा आणि त्याच्या भावाच्या अंगात अधूनमधून शक्ती संचारत असल्याचे नाटक केले जाई आणि भविष्यात काय काय करायचे आहे, याबाबत ते दोघे प्रवीणला सांगायचे. उदा. अन्नदान, आश्रम बांधणे वगैरे. तिथे भोंदू कपिले बाबा साधारणतः नऊ महिने साधनेसाठी थांबला.

२०१६ सालातील दत्तजयंती कार्यक्रमासाठी विमानाने डेहराडूनपर्यंत जाऊन पुढे मंडल, चमोली उत्तराखंड येथे जाऊन, कपिले बाबाच्या साधनेचा आणि अन्नदानासाठी लागणारा संपूर्ण खर्च सुमारे १,००,००० रुपये टप्प्याटप्प्याने प्रवीणने केला. तो सर्व रोकड स्वरूपात केला. कारण भोंदू कपिलेने दान करण्याचा आदेश प्रवीणला दिला होता. तो त्याला आजारी पडण्याच्या भीतीमुळे मान्य करावा लागला होता.

२०१७ सालातील होळीपूर्वी बाबाने प्रवीणला फोन केला आणि सांगितले की, 'माझी साधना पूर्ण झाली, मला तुम्ही न्यायला कार घेऊन यावे, असा दत्तशक्तीचा आदेश आहे.' त्यानुसार प्रवीण आणि बाबाचा शिष्य योगेश भालेराव मुंबईहून प्रायव्हेट कार घेऊन स्वतःच्या खर्चाने बद्रिकाश्रम येथे गेले. तेथून त्याला मथुरा, वृंदावन, माहूरमार्गे पुसद येथे घेऊन आले. यासाठी अंदाजे ६०,००० रुपये खर्च झाला, जो प्रवीणला रोख स्वरूपात करावा लागला.

त्यानंतर पुसद येथे रात्री हवनामध्ये कपिले बाबाने अंगात दत्तगुरू संचारल्याचे नाटक केले आणि 'माहूर येथे नवीन आश्रम बांधायचा आहे', असे सांगितले. कपिले बाबा आणि त्याचे साथीदार रवी कपिले, सारिका कपिले, कैलास कपिले यांच्या अंगात विविध दैवीशक्ती संचारल्याचे नाटक उभे केले आणि त्यांनी पीडिताकडून मोबाईल, कार, कॅमेरा, देवाचे अलंकार, अन्नदानासाठी भांडी इत्यादी वस्तूंची मागणी केली. त्यांच्या त्या मागण्या प्रवीणने टप्प्याटप्प्याने पूर्ण केल्या. या वस्तू प्रवीणने अमेझॉन आणि फ्लिपकार्टमधून ऑनलाईन मागवून त्यांच्या घरच्या पत्त्यावर पाठवल्या. तसेच सुमारे ८२००० रुपये किमतीचा पॅनासॉनिक कंपनीचा कॅमेरा खरेदी करून बाबांना दिला. हा कॅमेरा प्रवीणच्या स्टेट बँकेच्या क्रेडिट कार्डवर खरेदी करून दिला होता, अशी नोंद कार्ड स्टेटमेंट तिथे उपलब्ध आहे. भोंदू कपिले बाबा यास सेकंड हँड मारुती ए स्टार कार (नोंदणी क्रमांक एम एच-०२ बीवाय ७८५९) पीडित प्रवीणने स्वतः च्या नावावर खरेदी करून बाबाच्या आदेशानुसार त्यांना वापरायला दिली. ती कार कपिले बाबा आपल्या गावी घेऊन गेला आणि आजतागायत ती तोच वापरत आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे, आधी कपिले बाबाच्या आणि साथीदारांच्या अंगात संचार झाल्यावर त्याने आश्रम बांधण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार वर्ष २०१८-१९ मध्ये आश्रमाचे बांधकाम चालू केले. हे बांधकाम एक-दीड वर्ष चालू होते. या बांधकामासाठी तसेच या कालावधी दरम्यान केल्या जाणाऱ्या अन्नदान आणि अन्य विधीसाठी बाबाच्या आदेशानुसार प्रवीणने वेळोवेळी आरटीजीएसमार्फत कपिले बाबाच्या खात्यावर तसेच त्याने दिलेल्या दुकानदार आणि अन्य लोकांच्या खात्यांवर पैसे पाठविले आहेत. तसेच काही प्रमाणात रोकड स्वरूपातसुद्धा पैसे दिले आहेत. अशी एकूण रक्कम रु.१६,५०,००० आहे.

कपिले बाबाचे साथीदार कपिले बाबाची पूजा त्याच्या शरीरावरील विविध भागावर पैसे ठेवून (पाचशेच्या नोटा) पैशाची पूजा करीत असत. त्यांची पूजा करून झाली की, सर्व पीडित व उपस्थित शिष्यांनी पण त्याची पैशाने पूजा करावी, असा दंडक होता. कधी कधी त्या पूजेत कपिले बाबाच्या अंगात दत्तशक्तीचा संचार होत असे. त्यावेळी सगळेजण दत्तआरती म्हणायचे. अशा प्रकारच्या पूजा वर्षातून अनेक वेळा होत होत्या. अशा पूजेमध्ये प्रवीणने साधारण ६०००० रुपये कपिले बाबाला दिले आहेत.

२०१८ सालातील राखी पौर्णिमेला माहूर येथे दत्त योग आश्रमात भोंदू कपिले बाबा आणि त्याच्या साथीदारांना अंगात दत्तशक्ती संचारल्याचे नाटक केले आणि त्या दरम्यान त्यांनी प्रवीणला तुझा आजार पुन्हा बळावेल अशी भीती दाखवून आश्रमासाठी तूप, भांडी, अन्य वस्तू टप्प्याटप्प्याने मागवून घेतल्या. तूप (शिवनेरी ब्रँड) घेण्यासाठी सुमारे रु.६०००० रोख प्रवीणने टप्प्याटप्प्याने खर्च केले. आणि भांडी तसेच अन्य वस्तू

अमेझॉन आणि फ्लिपकार्डमार्फत प्रवीणने त्याच्या बँक खात्यावरील पैशातून मागवून बाबाला दिल्या आहेत. तसेच बाबांनी आश्रमासाठी पाच गाई मागितल्या. त्यासाठी रु.१००००० कपिले बाबा यास प्रवीणने दिले आहेत. त्या पैशातून कपिले बाबांनी पाच गायी विकत घेतल्या.

२०१७ ते २०२० या काळात प्रवीणने साधारण १,७५,४४२ रुपयांच्या वस्तू घेऊन बाबांच्या घरी आणि वैयक्तिक आश्रमात पार्सलने पाठविल्या आहेत.

२०१९ च्या राखी पौर्णिमेला माहूर येथे प्रवीणला आश्रमात बोलवले. तो तिथे आला असता, कपिले बाबाच्या अंगामध्ये दत्तशक्तीची सवारी आली आणि त्या दरम्यान तो प्रवीणला म्हणाला की, 'दत्तशक्ती तुझ्यावर प्रसन्न आहे, तू आता साधनेसाठी, सेवेसाठी आश्रमात ये, तुझी व्याधी कायमची जाईल आणि आला नाहीस तर तुझा आजार परत बळावेल.' मग प्रवीणने नोकरीचा राजीनामा नोव्हेंबर २०१९ मध्ये दिला आणि बाबाने प्रवीणला भीती घालून त्याच्या पैशातून बांधलेल्या नवीन आश्रमात तो आला. बाबांनी साधनेचा खर्च मागितला म्हणून दोन लाख रुपये प्रवीणने नेहमीप्रमाणे आरटीजीएस करून पाठवले.

आश्रमात विश्वजीत कपिले बाबाच्या सख्ख्या भावाची म्हणजे रवी कपिलेची सासू शोभा गोडबोले राहात होती. तसेच राहुल चंद्रकांत आराध्ये, उद्धव किसन माने आणि ऋषिकेश सुभाष शिंदे हे शिष्य आश्रमात राहात होते. दत्त योग आश्रम (माहूर) येथे प्रवीणला साधनेसोबत आश्रमात झाडू मारणे, शेण काढणे, घोड्यांची निगा राखणे, जेवण बनविणे, पाणी भरणे, शेतात कामे करणे अशी कामे दैवी दहशतीच्या प्रभावाखाली पूर्ण करावी लागली.

आश्रमात विश्वजीत कपिले बाबा येणाऱ्या पेशंटला जडीबुटीच्या उपचाराच्या नावाखाली हवन, भूत बाधा काढणे, लक्ष्मी बंधन तोडणे (लक्ष्मीचे आलेले बंधन तोडणे), मटका-आकडा सांगणे, गुप्त धन शोधून देणे, पैसे घेऊन शक्ती-पात देणे, कासव आणि मांडूळ यांच्यावर विधी करण्यास भाग पाडीत होता. हे करताना तो सतत आपल्या अंगात दैवीशक्ती असल्याचा दावा करीत असे. या सर्व गोष्टी कपिले बाबा आश्रमात मनमानी रक्कम घेऊन करत होता. कपिले बाबा गुप्त धनासाठी खड्डे खोदू लागला. माहूरचा किल्ला आणि परिसरात प्रवीणसह अन्य भक्तांनी बरेच खड्डे खोदले आहेत. या कामासाठी बाबाचा भाऊ रवी कपिले, कैलास कपिले बरेचदा सोबत असायचे. पण एकदाही गुप्तधन सापडले नाही.

हवनावर बसण्यापूर्वी कपिले बाबा प्रसाद म्हणून जडीबुटी, ताईत देत असे, मंतरलेले पाणी प्यायला देत असे. त्यानंतर हवन किंवा ध्यानविधी करताना भक्तांच्या शरीरात काहीतरी संचार होत असल्यासारखे वाटत असे. त्या वेळी प्रवीणही मोठमोठ्याने विचित्र आवाज काढून ओरडायचा. त्यावेळी त्याला काहीच समजायचे नाही, असे तो म्हणतो. असे प्रकार इतर शिष्यांना पण व्हायचे. त्यावर कपिले बाबा म्हणायचा की, 'काहींमध्ये भूताचा तर काहींमध्ये देव, देवतांचा संचार होतो.' काही वेळेस तो शिष्यांना अंगात भूत असल्याचे सांगून काठीने मारत असे. हवनामध्ये साधारणतः पौर्णिमा, अमावस्या या दिवशी तो मानवी रक्ताची आहुती द्यायचा आणि शिष्यांना पण द्यायला भाग पाडायचा. या विधीसाठी स्वतःचे रक्त काढणे आवश्यक असते. त्यासाठी इस्पितळात सलाईन देण्यासाठी लागणारा स्काल्प व्हेन रक्ताच्या शिरेमध्ये टोचून त्यामार्फत रक्त काढले जायचे, रक्ताचा अभिषेक हवनामध्ये आणि मूर्तींवर करावा लागे. असा अभिषेक प्रवीण दर पौर्णिमा आणि अमावास्येला तीन वर्षे बाबाच्या सांगण्यावरून करीत होता. कपिले बाबा, त्याचा भाऊ रवी रामचंद्र कपिले, सारिका रवी कपिले आणि कैलास रवी कपिले यांनी २०१३ ते २०२० या काळात दत्त योग आश्रम (माहूर) येथे संगनमत करून प्रवीणला अलौकिक तंत्र विद्येची व भूतबाधा याची भीती दाखवून त्याचा शारीरिक, मानसिक आणि आर्थिक छळ करून त्याची एकूण २३ लाख १४ हजार ५४९ रुपयांची रोख, आर.टी.जी. एस. आणि वस्तू स्वरूपात आर्थिक फसवणूक केली आहे. ही सर्व रक्कम दिल्याचे सर्व पुरावे प्रवीणकडे उपलब्ध आहेत. आपल्याला आणि अन्य भाविकांना दैवी शक्तीची भीती दाखवून आणि बुवाबाजी करून फसवले जात आहे, आपली फसवणूक केली जात आहे हे लक्षात आल्यावर प्रवीण याने महाराष्ट्र अंनिसच्या डोंबिवली शाखेच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला आणि भोंदू कपिले बाबावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी आणि आर्थिक फसवणूक करून भोंदू कपिले बाबाने लुबाडलेले पैसे परत मिळवण्यासाठी मदत करण्याची विनंती केली. कार्यकर्त्यांनी त्यास जादूटोणाविरोधी कायद्याची, बुवाबाजीची माहिती देऊन त्याला पोलिसात तक्रार देण्यासाठी तयार केले आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती त्याला पूर्ण साथ देईल असा धीर दिला. मग, सर्व पुरावे गोळा करून पोलिसात द्यायच्या तक्रारीचा मसुदा बनवून दिला आणि गुन्हा नांदेड जिल्ह्यात घडलेला असल्याने राज्य प्रधान सचिव माधव बावगे यांच्याकडे पुढील कारवाईसाठी संपूर्ण प्रकरण सुपुर्द केले. प्रवीण सारनिकर याने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली माहूर, जिल्हा नांदेड येथील पोलिसांकडे एका सविस्तर निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे. या निवेदनाबरोबर त्याने झालेल्या आर्थिक व्यवहाराचे, बाबांनी कळवलेले बँक खाते क्रमांकाची माहिती, प्रवीणच्या बँक खात्यातून झालेल्या व्यवहारांचे बँक स्टेटमेंट, आर.टी.जी. एस च्या स्लिप, फोटो, व्हिडिओ हे सर्व पुरावे तारीखवार सादर केलेले आहेत.

प्रवीण याची तक्रार आणि महा. अंनिसच्या संपूर्ण प्रयत्नामुळे तसेच पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे, अंधश्रद्धेचे माहेरघर असलेल्या माहूर (गड), जिल्हा नांदेड येथील दत्त योग आश्रमाचा कुख्यात भोंदूबाबा विश्वजीत कपिले आणि दोघे साथीदार यांना दिनांक १३.१०.२०२१ रोजी माहूर पोलिसांनी अटक केली. जादूटोणाविरोधी कायदा २०१३ च्या कलम ३ सह, भा. द. वि. १८६० नुसार कलम ४२०, ३२८, ५०६ आणि ३४ या कलमानुसार गुन्हा नोंद झाला. त्यांना कोर्टात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या संपूर्ण काळात मी स्वत: प्रत्येक बाबीवर व्यक्तिशः लक्ष ठेवले. या कामी नांदेड येथील कर्तव्यदक्ष अतिरिक्त पोलीस अधीक्षक, श्री. विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी विलास जाधव, पो. नि. नामदेव रिठे, स. पो. नि. अण्णासाहेब पवार, कॉन्स्टेबल प्रकाश देशमुख, पो. नाईक विजय आडे यांनी कारवाईत भाग घेतला. माझ्यासह ॲड. तृप्ती पाटील, उत्तम जोगदंड (कल्याण-डोंबिवली), गुणवंत पाटील हांगर्गेकर, डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. बालाजी कोंपल्वार, डॉ.हंसराज वैद्य, जिल्हा कार्याध्यक्ष श्रीनिवास शिंदे (नांदेड), डॉ. बाबा डाखोरे, मनोज कीर्तने, ज्ञानेश्वर कऱ्हाळे, साजिद शेख, जयकुमार अडकिने, राज ठाकुर, ज्ञानेश्वर पवार (अंनिस शाखा माहूर) यांनी परिश्रम घेतले. या बाबाची सखोल चौकशी केली असता त्याच्यावर अनेक गुन्हेगारी स्वरूपाच्या केसेस नोंदल्या गेलेल्या असून, त्या कोर्टात चालू आहेत, असे निदर्शनास आलेले आहे.

बुवाबाजी ही माणसाच्या बुद्धीवर घाला घालते. एकदा का व्यक्ती किंवा समूह, बुवाबाजीच्या विळख्यात सापडले की ते त्यातून बाहेर येऊ शकत नाहीत. कारण बुवाबाजीच्या माध्यमातून प्रचंड पैसा, त्यातून पोसलेली गुंडगिरी, बुवाबाजीत असलेली शिष्य, भक्त लोकांची मोठी गर्दी, त्यामुळे मतलबी मताच्या हमीसाठी छुपा राजकीय वरदहस्त, पोलिसांच्या बाबतीत हप्तेगिरीची अफवा, यामुळे आपले काही चालू शकत नाही, असे समजून पीडित तक्रार करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे बुवाबाजीच्या या बिनभांडवली धंद्यात अनेक लोक गुंतलेले असतात. यात सामान्य माणसांचे होणारे आर्थिक, मानसिक, प्रसंगी महिलांचे शारीरिक शोषण हे कायद्याच्या मार्गाने थांबवण्यासाठी महा. अंनिसने शासनाला जादूटोणाविरोधी कायदा मंजूर करण्यास भाग पाडले. त्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकरांना हौतात्म्य पत्करावे लागले. आता कायदा आहे. पीडित लोकांनी बुवाबाजी विरोधात पुराव्यासह पुढे यावे. महा. अंनिसचे पाठबळ आणि कायद्याचा बडगा यातून बुवाबाजी संपुष्टात येऊ शकते. आजपर्यंत जवळपास पाचशेहून अधिक गुन्ह्यांची नोंद झाली आहे आणि बहुतांश भोंदू बुवाबाबांनी आपला गाशा गुंडाळला आहे. चोरी छुपे जिथे कुठे बुवाबाजी चालते तेथील पीडित आणि नागरिक कर्तव्यभावनेने पुढे आले तरच हे अघोरी शोषण थांबू शकेल.

(लेखक महा. अंनिसचे प्रधान सचिव आहेत.)

●


# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

- **वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्यांनी विवेक जागर संस्थेच्या खालील अकाऊंट नंबरवर ऑनलाईन वर्गणी पाठवावी आणि अजय : ९३५९०८०८२० अथवा विशाल : ७२७६५५९३१८ यांना व्हॉटस् ॲप नंबरवर कळवावे.**

***VIVEK JAGAR SANSTHA***
**ICICI Bank, Mundada Market, Dhule**
**A/c No.: 646301002757**
**IFSC Code : ICIC0006463**
**PAN : AADTV0009R**

**वार्षिक वर्गणीदार व्हा !**
**व्यक्तीसाठी - ४०० रु.**
**संस्थेसाठी - ५०० रु.**

**संपादक**
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
कल्पतरू, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर,
जि. सांगली-४१५४०९. मो.: ९८६०४३८२०८ ईमेल : manspatrika@gmail.com



# ...तसाच संदेश अंड्यावरी दिसे

चमत्कार जनामनातील

मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४७३७०२

नगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील बेलापूर पासून जवळच असलेल्या करंजा गावातील एक पठाण बाबा. खरे म्हणजे पठाणाचे वैशिष्ट्य असे की, या गृहस्थाच्या अंगात मुसलमानांचे पीर व हिंदूचेजालींदरनाथ अशा दोन संयुक्त देवतांची आघाडी असलेले वारे संचारत असे. एकदा तर या पीर-पठाण जालंदरनाथ यांच्या वाऱ्याने भारीत बाबा पठाणाने, शकील महंमद बागवान यांच्या मुलाचा जीवच घेतला. पीर पठाण बाबांच्याकडे जेव्हा मुसलमान गिऱ्हाईक येई तेव्हा ते पीराचे वारे शरीरात घुमवीत आणि गिऱ्हाईक जर हिंदू असेल तर, मग हमखास जालींदरनाथाचा वारा अंगात खेळे.

शकील महंमद बागवान यांच्या लहान मुलाला श्वास घेण्यास त्रास होत असे. ते धापा टाकायचे. खूप प्रकारचे उपचार व अनेक मुल्ला, फकीर, ज्योतिषी, पोपटवाले, त्याशिवाय जंगली जडीबूटीवाले व मुस्लीम तावीज गंडे-दोरे देणारे बंगाली बाबा या सर्वांकडे मुलाला फिरवून आणले होते. कोणी तरी बाबाभाई पठाणांचा पत्ता त्यांना दिला. या लहान मुलाचा श्वसनाचा त्रास कायम घालवण्यासाठी ह्यांनी पीराचा व जालंदरनाथाचा वारा अशी संयुक्त वाऱ्याची दिशाशरीरात संचारून चक्क मुलाच्या छाताडवर दोन्ही पाय ठेवून त्याचा जीव घेतला. या व अशा अनेक प्रकरणात नगर जिल्हातील बेलापूरच्या महा अंनिस शाखेने दखल घेवून या पठाणाची बुवाबाजी बंद करण्यासाठी मच्छिंद्र वाघ व प्रा. बंगाल सरांनी प्रयत्न केले होते. याच पीर बाबाकडे एकदा एका शेतकरी कुटुंबातील बाईने नवरा खूप दारु पितो व मारहाण करतो, त्याची दारू सुटावी म्हणून गाऱ्हाणं मांडलं होतं. पीरबाबाच्या दरबारात गर्दी असायची. अशाही परिस्थितीत चार तास थांबून महिलेने पीराकडे तक्रार मांडली. मग पठाणाकडून सदर महिलेला दुसऱ्या दिवशी अर्धा डझन अंडी व एक डझन केळी आणण्यास सांगितली. महिलेने सर्व साहित्य घेऊन दुसऱ्या दिवशी पठाणाकडे हजेरी लावली. जेव्हा महिलेचा नंबर आला तेव्हा पीराचा वारा संचारला, पाटावर तांदूळ पसरले व त्यावर अंडी ठेवली. बाजूला एका ताटात केळी, फूले, अगरबत्ती सारे काही मांडून ठेवले. घुमता घुमता पठाणाने एका भांड्यात पाणी घेतले व एक अंडे उचलले. त्या पसरट भांड्यात पाण्यावर अंडे सोडले आणि काही वेळानंतर त्या अंड्यावर संदेश आला. 'खतरनाक संकट' वाचून महिलेला चक्कर आली. तिला पठाणाने सावरल, धीर दिला, माते घाबरु नकोस आपण तुमच्या घरावर आलेले संकट टाळू शकतो. फक्त त्या करीता काही खर्च येईल तो करावा लागेल. बिचारी महिला तयार झाली व तीन हजार रूपयांना लुटली गेली. नवऱ्याची दारु सूटली नाहीच उलट वर्षभरात नवऱ्याचे दारुपायी निधन झाले.

दावा:-पठाणाच्या अंगात सर्व देवादिकांचे वारे खेळतात. त्यांना सर्व तऱ्हेची देव-देवता, अल्ला, खुदा प्रसन्न आहेत. त्यामुळे प्रत्येक दुःखावर व मानवी समस्येवर त्यांचेकडे इलाज आहे, अशी मानसिकता समाजात आहे.

**रहस्यभेद:**

वास्तवात (पीर बाबाने) अगोदरच एका अंडयावर 'खतरनाक संकट' असे मेणाने (पॅराफिन वॅक्स) लिहिलेले होते. गंगाजलाच्या नावाने जवळ ठेवलेले बाटलीतील तीर्थ पसरट भांड्यात ओतले. खरे ते गंगाजल नव्हते तर, ते व्हिनेगर (सौम्य ॲसिड) होते. त्यावर अंडे ठेवल्यानंतर जेवढ्या भागावर मेणाने लिहिलेले होते, तो भाग मंद ज्वलनाने झरला नाही.बाकी संपूर्ण अंड्यावरील कॅल्शियम कार्बोनेटवर व्हिनेगरची रासायनिक अभिक्रिया होऊन ते झरले व फक्त लिहिलेली अक्षरे स्पष्टपणे दिसू लागली. अनेक बदमाश वेगवेगळे संदेश अंड्यावर लिहून फसवतात.महिलेने आणलेल्या अंडयात बाबाने स्वतःचे अंडे घुसवले. बाकी सारी बदमाशी. इतर केळी व अंडी बाबाने स्वत:साठी वापरली वर तीन हजार रूपयांची लूट केली.

(लेखक, महा. अंनिसच्या प्रकाशन विभागाचे कार्यवाह आहेत.)

●

## विचारधन

- सोयीसाठी वा श्रद्धेसाठी अगतिकतेने वा आशेने सारासार विचार माणसे अथवा समुदाय गहाण ठेवतात. तसे दाखवून देणे ही त्यांना आवडत नाही. त्याविरुद्ध संघर्ष करणे दूरच राहिले. उलट त्यामध्येच समर्थ क असल्यासारखे त्यांचे आग्रही वागणे असते.
- संमोहनशास्त्र तसे कोणालाही प्रयत्नाने साध्य होणारे शास्त्र आहे. व्यक्तीची मनोधारणा हितसंबंध लक्षात घेवूनच तिला संमोहित करावे लागते. मोकळेपणाने आणि विश्वासूपणे संमोहनाकडे बघावयास शिकले पाहिजे. हे शास्त्र अवगत असलेल्या व्यक्तीला काही गूढ दैवी शक्ती अनुकूल असते ही समजूत पूर्णपणे खोटी आहे, हे समजून घ्यावयास हवे, इतरांना सांगायला पाहिजे.

**– शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर**

जडणघडण

# ...ही तर प्रथम माझीच गरज होती



रविंद्र पाटील
८५५२९४४१७३

मी रविंद्र पाटील. सध्या शहादा येथे स्थायिक. माझे मूळ गाव नगाव, ता. अमळनेर, जि. जळगाव. शालेय शिक्षण गावातच झाले. नंतर अर्धवेळ नोकरी करीत असतानाच शहादा येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. शहादा तालुक्यातच खेडदिगर या गावात सन २००२ पासून चार वर्षे माझे वास्तव्य होते. तेव्हा आताचे महाराष्ट्र अंनिसच्या उत्तर महाराष्ट्र विभागाचे सरचिटणीस विनायक सावळे यांच्याशी माझा परिचय झाला. त्या चार वर्षांत आम्ही नोकरी, व्यवसाय आणि इतर अनेक विषयांवर मित्रत्वाने भरपूर गप्पा-चर्चा करायचो. पण विनायक सर त्या काळातही अंनिसचे क्रियाशील कार्यकर्ता असूनही मला कधीच अंनिसच्या कार्याबद्दल बोलले नाहीत, सहभागी व्हा असे म्हटले नाहीत किंवा त्यांनी कार्याची माहिती सुद्धा कधी दिली नाही. त्या चार वर्षानंतर मी शहादा येथे स्वतःच्या घराचे बांधकाम केले. माझ्या सोबतच विनायक सरांनी देखील त्यांच्या घराचे बांधकाम केले.

बांधकाम झाल्यावर २००५ मध्ये विनायक सर मला एक दिवस म्हटले 'तुमची नोकरी आता पूर्णवेळ झालेली आहे व घराचे बांधकाम देखील झालेले आहे. तुम्ही आता बरे स्थिरस्थावर झाले आहात, थोडे मोकळे आहात; तर दर मंगळवारी एम. डी. टेलर यांच्या दुकानात होणाऱ्या अंनिसच्या साप्ताहिक बैठकीला येत चला'. त्याप्रमाणे मी देखील त्यांना होकार दिला व पहिल्या मिटींगला गेलो. थोडं नवीन वाटलं पण थोडं कुतूहल देखील वाटत होतं. हळूहळू शाखेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहू लागलो. अंनिसची कार्यपद्धती, संघटन आणि वैचारिक पाया समजत गेला. हे कार्य समजून घेण्याची प्रथम मला स्वतःलाच गरज असल्याची जाणीव झाली आणि आपण योग्य ठिकाणी आलो आहोत याचे समाधान वाटू लागले. परंतु आपले मित्र, कुटुंबातील लोक, नातेवाईक काय म्हणतील, आपण जे कार्य करत आहोत ते त्यांना आवडेल का अशी शंका सुरुवातीला वाटत होती. त्याचवेळी स्वतःच्या म्हणून अशा काही माझ्याच श्रद्धा होत्या. माझ्या या श्रद्धांची हळुवार चिकित्सा माझ्या आतच होऊ लागली आणि काही दिवसांनी श्रद्धा व अंधश्रद्धा याविषयीच्या संकल्पना अगदी स्पष्ट झाल्या. हे काम माझ्या स्वतःमध्ये बदल करण्यास खूप मदत करेल याची खात्री झाली. मी जो हळूहळू बदलत गेलो तो आजपर्यंत बदलण्याचा सतत प्रयत्न करतोच आहे.

एक वर्षानंतर शहादा शाखेचा क्रियाशील कार्यकर्ता म्हणून शाखेच्या सर्व कार्यात सहभाग घेऊ लागलो. मनिलालभाई पटेल (लांबोळेकर) शाखेचे कार्याध्यक्ष होते. प्रदीप केदारे प्रधान सचिव होते. दोघेही फार जुने कार्यकर्ते होते. त्यांच्या कार्याचा अनुभव, त्यांचे मार्गदर्शन यातून सतत शिकत राहिलो. त्याचवर्षी दिवाळीच्या काळात अंनिसच्या पुस्तकांचा स्टॉल लावण्याची संकल्पना साप्ताहिक बैठकीत मांडली गेली आणि तसे सर्वानुमते ठरले सुद्धा. स्टॉल उभा करणे म्हणजे एक दिव्यच होते. स्टॉलच्या या उपक्रमात दिवाळी सणाच्या दिवसात पंधरा दिवस आम्ही सर्वच कार्यकर्ते राबत होते. तोपर्यंत दरवर्षी दिवाळीची सुटी लागल्यावर दुसऱ्याच दिवशी गावाला जाणारा मी त्या वर्षी स्टॉल लागला म्हणून शहद्यालाच थांबलो. दरवर्षी स्टॉल लागतच राहिला आणि माझे गावाकडे जाणे बंदच झाले. रात्री १२ वाजेपर्यंत स्टॉल सुरु राहायचा. मी रात्री लवकर घरी यायचो व सकाळी ६ वाजता स्टॉलवर हजर होवून झोपलेल्या कार्यकर्त्यांना घरी पाठवायचो; संपूर्ण स्टॉलची साफसफाई करायचो. पंधरा दिवस अगदी कामात जायचे. अशा पद्धतीने अंनिसच्या कामात हळूहळू गुंतत गेलो.

अशा उपक्रमांमध्ये गुंतल्यामुळे कधी घरच्या कामात दुर्लक्ष व्हायचे. तरीही माझी पत्नी जास्त कुरकूर न करता सांभाळून घेत असे. एक मात्र नक्की अंनिसच्या कार्यामुळे कुटुंबीय, नातेवाईक, सहकारी यांच्याशी माझ्या वागण्यात कमालीचा बदल होत गेला. अंनिसचे काम करताना कधीही नोकरीच्या ठिकाणी माझे दुर्लक्ष झाल्याचे एकही उदाहरण मला आठवत नाही. प्रथम नोकरी नंतर प्रसंगानुसार बऱ्याचदा अंनिसचे कार्य आणि कुटुंब असा क्रमबदल आज देखील चालू आहे. कुटुंबात, नोकरीच्या ठिकाणी, नातेवाईकात, समाजात वावरतांना संघटनेची नीती आणि विवेक ही तत्त्वे पाळण्याचा मी नेहमीच कसोशीने प्रयत्न करीत असतो.

मी डॉ. नरेंद्र दाभोलकरांची सर्व पुस्तके किमान दोन ते तीन वेळा वाचलेली आहेत. डॉक्टरांचा सहवास मला फक्त एकाच कार्यक्रमात लाभला. तो अखेरचा ठरल्यामुळे त्याच्या अपूर्णतेची खंत मात्र माझ्या मनात कायमस्वरूपी आहे. डॉ. दाभोलकर २०१० मध्ये शहादा येथे आले असतांना शहादा शाखेने डॉक्टरांचे 'प्रश्न मनाचे' या पुस्तकाचे प्रकाशन व कुटुंब मेळावा असा कार्यक्रम ठेवलेला होता. डॉ. दाभोलकर विनायक सरांच्या घरी आलेले होते. मी शाळेतून ६ वाजता घरी आल्यानंतर तडक कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचलो. डॉक्टर

आणि शहादा येथील काही मान्यवर मंडळी सरांच्या घरी हॉलमध्ये बोलत बसलेले होते. मी हॉलमध्येच एका खुर्चीवर बसलो. डॉक्टर बोलत होते; त्यांचे बोलणे ऐकतच राहावे असे मला वाटत होते. त्याचवेळी मला कार्यक्रमाच्या ठिकाणी साहित्य घेऊन बोलवण्यात आले. नंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी डॉक्टर आल्यानंतर सुरुवातीला प्रत्येक कार्यकर्त्याने आपला व कुटुंबाचा परिचय करून द्यायचा होता. काही कार्यकर्त्यांच्या नावानंतर माझे नाव स्टेजवरून चार ते पाच वेळा पुकारले गेले. पण मी नवीनच आणि एक अगदी साधारण कार्यकर्ता असल्याने डॉक्टरांच्या समोर काय बोलावे याबद्दल मनात ऐनवेळी प्रचंड गोंधळ झाला. मी कार्यक्रमाच्या हॉलच्या बाहेरच होतो आणि माझ्या नावाचा पुकारा ऐकत होतो. परंतु मी परिचय द्यायला स्टेजवर गेलोच नाही. मात्र त्यावेळी डॉक्टरांच्या समक्ष मी परिचय देऊ शकलो नाही याची हळहळ मात्र कायम मनात राहिली आहे.

शहादा शाखेच्या कार्यात वर्षभर सक्रिय राहिल्यामुळे मला दुसऱ्याच वर्षी शहादा शाखेच्या कार्याध्यक्षाची जबाबदारी देण्यात आली व ती जबाबदारी मी पुढील पाच वर्षे सांभाळली. त्या काळात प्रत्येक वर्षी शहादा शाखेने भरपूर कार्यक्रम राबविले. त्याच काळात २०१३ मध्ये डॉक्टरांच्या हत्येच्या बातमीने कमालीचा व्यथित झालो. कुटुंबातीलच एक सदस्य गेल्याचे दुःख झाले. त्यातून सावरून जास्त उमेदीने काम करत पुढे जात राहिलो. शाखा कार्याध्यक्ष झाल्यावर चमत्कार सादरीकरणाचे प्रशिक्षण घेऊन गणपती व नवरात्र उत्सवात, शाळा कॉलेजमध्ये तसेच खेडोपाडी कार्यक्रम आयोजित करून चमत्कार सादरीकरण करू लागलो. पुढे जिल्हा कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी आल्यावर जिल्हयात काम आणि संघटन वाढविण्याबरोबरच प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणात 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयाची मांडणी करू लागलो. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (N.S.S.) कॅम्पमध्ये चमत्कार सादरीकरण व वैज्ञानिक दृष्टिकोन हा विषय मांडत असतो.

जिल्हयातील आणि शहरातील जाहिरातदार, देणगीदार, हितचिंतक, 'अंनिप'चे वर्गणीदार, प्रशिक्षणार्थी शिक्षकवर्ग, विद्यार्थीवर्ग असे सर्वच आज अंनिस कार्यकर्ता म्हणून मला ओळखतात. शिक्षकी पेशाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनासह विविध उपक्रम राबवून त्यांचा विविधांगी विकास करण्याचा प्रयत्न करतो आहे. या सर्वांच्याच माध्यमातून पुन्हा संघटना वाढीसाठी प्रयत्न करतो आहे.

माझ्या या सर्व जडणघडणीत माझे पहिले गुरु माझे आई आणि वडील आहेत. त्याचबरोबर शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांतून व कार्यातून आणि राज्यातील सर्वच ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांच्या कार्यशैलीतून व अनुभवातून सतत प्रेरणा मिळत असते. त्यांचे अनुकरण करून विवेकशील व नीतीमान कार्यकर्ता होण्याचा प्रयत्न करीत आहे.


(लेखक, महा. अंनिसचे नंदुरबार जिल्हा कार्याध्यक्ष आहेत.)

●

## होळीतल्या पुरणपोळ्या थांबवितात भुकेच्या कळा

**नागपूर :** कोराडी रोडवरील अनेक पेटत्या होळ्यांमध्ये टाकल्या जाणाऱ्या असंख्य नैवेद्याच्या पोळ्या, नारळ, गाठी, प्रसाद संकलित करून जवळच्या दिव्यांग शाळेतील भुकेल्यांच्या कळा थांबविण्यासाठी उपयोगी ठरल्या आहेत. कोराडी रोड परिसरामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कोराडी शाखेने पर्यावरण पूरक होळी अभियानाअंतर्गत होळी लहान करा, पोळी दान करा. हे आवाहन नागरिकांना केले होते. या आवाहनात्मक हाकेला कोराडी विद्युत विहार परिसरातील होळी उत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. होळीमधील नैवेद्याच्या स्वरूपात नष्ट होणाऱ्या पुरणपोळ्या, गाठी, नारळ तसेच पूजेच्या ताटातील अन्य खाद्यपदार्थ वाचविले. ह्या पोळयांचे संकलन करण्याचे काम रात्री सात ते दहा वाजेपर्यंत प्रत्येक होळीजवळ जाऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, शाखा प्रधान सचिव विलास भालेराव, युवा सहभाग कार्यवाह राजू साळवे यांना केले. या संकलित झालेल्या पुरणपोळया जवळच्या कोराडी रोडवरील साईगुरु व काटोल रोडवरील जीवनधारा या दोन विशेष मुलांच्या विद्यालयातील भुकेल्यांना एक वेळच्या भोजनाच्या रुपाने दिल्या.

भोजनानंतर दिव्यांग विद्यार्थ्यांनी सामूहिक गीत गात आनंद व समाधान व्यक्त केले. यावेळी अंनिसचे जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग, शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड, महिला कार्यवाह संगीता आळणे, निलेश साळवे व आशिष साळवे उपस्थित होते. या उपक्रमामध्ये सोनाली वानखेडे, अरुणा देशमुख, स्वाती पटले, सविता ढेंगे, जया कामडी, नीलिमा शिंदे, वैष्णवी डोंगरे, पूजा देरकर, भूमिका ताजने, प्रीती नीर, सीमा गावनेर, तनु मारबते, स्नेहल लोंढे, वंदना खोडेकर, उज्वला गंदे, संगीता तरटे, दिलीप पटले, नागरगोजे, इत्यादींनी पुरणपोळ्या व खाद्यपदार्थ होळीत न टाकता अंनिस कार्यकर्त्यांना संकलित करून दिल्या. यावेळी होळीतून वाचवलेल्या पुरणपोळ्या, नैवद्य, गाठी, नारळ स्वच्छ बॉक्स मध्ये व्यवस्थित व वेळेवर उपलब्ध करून देणार्या सुज्ञ भगिनी व बांधवांचे गौरव आळणे यांनी विशेष आभार व्यक्त केले.



# जेंडर डेंजर बॉक्स

पुस्तक परिचय

प्रा.शाम जोगळेकर
९२७३३४३१७७

'जेंडर डेंजर बॉक्स' हे महेंद्र यांचे पुस्तक कोल्हापूरच्या राजगृह प्रकाशनने देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला महेंद्र यांचे मनोगत वाचावयास मिळते. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांच्यावर कोणतीच बंधने लादली नाहीत. घरातील सर्व कामे केल्यामुळे त्यांना समतेची वाट सापडली. प्रौढपणी त्यांना समाजातील स्त्रीपुरूष विषमता प्रकर्षाने जाणवू लागली. लेखन करावयाच्या माध्यमातून ते व्यक्त होऊ लागले. डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत समाविष्ट झाल्याने त्यामधील समतेचा विचार मनात रुजला. समविचारी जीवनसाथी मिळाल्याने जेंडर सेन्सिटायझेशनवर काम करण्याचे निश्चित झाले. दोन वर्षांपूर्वी पुरुषभान संवाद मंच नावाचा मुक्तमंच सुरू केल्याने, त्यामध्ये लिंग, लिंगभाव, लैंगिकता यासंबंधी चर्चा होऊ लागली. 'सांगायचं आहे' या ब्लॉगवर महेंद्र यांनी दर आठवड्याला लिहायला सुरुवात केली. या लेखांतूनच हे पुस्तक साकारले गेले आहे. पुस्तकातील लेख, जे जाणवले ते मांडावे, या विचारांतून लिहिले गेले आहेत. या पुस्तकाला गीताली वि. म. यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते पुस्तकातील लेखांची शीर्षके एकदम दिलखेचक आणि अर्थवाही आहेत. विषयांची विविधता स्तिमित करणारी आहे. शेवटी त्या लिहितात, 'बदलत्या काळानुसार पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेचे बदलते आयाम आणि आविष्कार यांचे सूक्ष्मपणे निरीक्षण करून त्यात हस्तक्षेप करायला हवा. त्यासाठी माणसा-माणसांमधलं नातं जास्त पारदर्शी, क्षमाशील आणि समावेशक व्हायला हवं'. या पुस्तकाचे रंगीत आणि कल्पक मुखपृष्ठ पुण्याच्या प्रतीक कालेकर यांचे आहे. या पुस्तकात एकूण एकवीस लेख समाविष्ट आहेत.

होलिकोत्सव आणि लिंगभाव विषमता या पहिल्याच लेखात महेंद्र लिहितात की, आपले बहुसंख्य सण-उत्सव हे पितृसत्ताकता आणि पुरुषप्रधानतेचे निदर्शक आहेत. ते स्त्रीला दुय्यम स्थान देतात. समतेचा विचार स्वीकारल्यास सण-उत्सव नाकारायला तरी हवेत किंवा त्यात बदल करणे गरजेचे आहे. होळीच्या सणात स्त्रीच्या शोषणाचे, दुय्यमत्वाचे प्राधान्याने दर्शन होते. होलिकादेवीचे दरवर्षी दहन केले जाते. त्यामधून आपण नक्की कोणता संदेश समाजात बिंबवतो याचाही विचार करायला हवा, असे महेंद्र सांगतात. अशीच निष्ठुरता सती प्रथेत होती. तिथेही जळणारी स्त्री होती आणि जाळणारी पुरुषी व्यवस्था होती. तिचीही आधी पूजा व्हायची आणि तिला जाळताना ढोल-ताशे वाजवले जायचे. आता होळी सणाविषयी पर्यावरणविषयक जागृती होते आहे.

'देवबाभळीच्या निमित्ताने-बा विठ्ठला' या लेखात तुकोबाची पत्नी आवली आणि विठ्ठलाची पत्नी रखुमाई यांचा विचार केला आहे. 'पुरुष जोडीदार' म्हणून दोघांकडे पाहिले आहे. नंतरच्या काळात ज्योती-सावित्री ही जोडी पुढे आली. या जोडीने केलेल्या कार्याची जाणीव महेंद्र यांनी करून दिली आहे. नंतरच्या लेखात महेंद्र यांनी जोतिबा आणि सवित्री या जोडप्याचे समता निर्माण करण्यातील महत्त्व सविस्तरपणे सांगितले आहे. 'विवाह संस्था-संरक्षण की शोषण' या लेखात प्रचलित विवाहपद्धतीतून प्रामुख्याने स्त्रियांचे शोषण कसे होते, हे प्रभावीपणे, सविस्तरपणे आणि सोदाहरण मांडले आहे. पितृसत्ताकता नष्ट केल्याशिवाय खरे समतेचे जीवन निर्माण होणार नाही, असे त्यांना वाटते.

'इज्जत-बिज्जत,' 'कपडे-लज्जा आणि बरंच काही,' 'अलंकार-प्रतिके आणि..' हे लेख विचारप्रवर्तक आहेत. विवाहसंस्थेच्या मुळाशी असणारी पितृसत्ता मुळापासून उखडून काढायला हवी. ती फक्त स्त्रियांसाठीच नाही तर मानवी मूल्ये विकसित करायची तर विषमतावादी सत्ता आधी नाकारली पाहिजे, असे महेंद्र ठासून सांगतात. विवाह, व्रते ही विषमतेवर कशी आधारलेली आहेत, हेही त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले आहे. स्त्री-पुरुष भूमिका जन्मापासून बिंबविल्या गेल्याने स्त्री-पुरुषांचा कोंडमारा कसा होतो हेही महेंद्र सांगतात. 'जेंडरच्या विषमतेत हरवलेला सेक्स', 'रिलेशन' हे लेख विचारप्रवृत्त करणारे आहेत. 'जेंडरच्या चौकटीतलं पालकत्व' हा लेख स्त्री-पुरुष आणि पालकांना निश्चितच मार्गदर्शक आहे. जेंडर रोलमध्ये अडकल्याने आपण स्वतःच्या आयुष्यातल्या अनेक गोष्टींना कसे मुकतो हेही महेंद्र यांनी उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. जीवनातल्या आनंद प्राप्तीसाठी पितृसत्ता, मर्दानगी, जेंडर रोल या कल्पना नाकारण्याचा सल्ला त्यांनी पुरुषांना दिला आहे. 'वारसा आहे-वसा हवा' हा शेवटचा लेख विचारप्रवर्तक झाला आहे. वारसा सांगणारांच्या गर्दीतून बाहेर पडल्याशिवाय परिवर्तनाचा वसा जपता येत नाही, हे कसे ते महेंद्र यांनी स्पष्ट केले आहे.

पुस्तकाचे नाव : जेंडर डेंजर बॉक्स
लेखक : महेंद्र
प्रकाशक : राजगृह प्रकाशन
किंमत : रु.१६०/-

●



# संघटितपणे पुढे जाण्याचा निर्धार


सुशीला मुंडे
९८७०७३०३६८


महाराष्ट्र अंनिसची राज्य कार्यकारिणी बैठक दिनांक २६ व २७ मार्च,२०२२ रोजी पुण्याच्या एस. एम. जोशी फाऊंडेशनमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. राज्यभरातून ३४ जिल्ह्यातून आलेल्या १५०राज्य पदाधिकाऱ्यांनी आपले ३२ वर्षाचे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्य जोमाने, संघटितपणे अधिक गतीने पुढे नेण्याचा निर्धार केला.

या राज्य बैठकीचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक नेते डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते झाले. समग्र परिवर्तनाचा विचार जिवंत ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे. प्रबोधन-संघर्ष आणि संघटन नेटाने केले पाहिजे. सामाजिक प्रश्नांसाठी कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवली पाहिजे. आधुनिकतेला साजेसे बदल संघटनांनी करायला पाहिजे, त्यासाठी कार्यकर्त्यांनी अपडेट असावे, असे प्रेरणादायी वक्तव्य आदरणीय बाबांनी केले.संघटनार्तंग व असणाऱ्या विविध विभागांची यावेळी चर्चा झाली.त्यामध्ये बुवाबाजी संघर्ष विभाग, विविध उपक्रम, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प, पुस्तक प्रकाशन व वितरण विभाग, जाती-अंत संकल्प विभागातील आंतरजातीय-आंतरधर्मीय, मिश्र विवाह, जातपंचायत मूठमाती अभियान, जोडीदाराची विवेकी निवड, महिला विभाग, युवा विभाग, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, निधी व्यवस्थापन, मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग, सोशल मीडिया विभाग,सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग, प्रशिक्षण विभाग, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समन्वय विभाग, विज्ञानबोध वाहिनी, कायदा व्यवस्थापन विभाग, दस्तऐवज संकलन या सर्व विभागांच्या कार्याचा आढावा घेऊन पुढील नियोजन करण्यात आले.

'वारसा संतांचा... विवेकाचा... माणुसकीचा' हे अभियान मे महिन्यात राबविण्यात येणार आहे. मा.श्यामसुंदर सोन्नर महाराज यांचे या उपक्रमात सहकार्य घेण्यात येणार आहे. महा.अंनिसच्या पुढाकाराने संमत झालेल्या जादूटोणा विरोधी आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याची माहिती पुस्तिका काढण्यात येणार आहे. सध्या दोन्ही कायद्याअंतर्गत नोंद झालेल्या गुन्ह्यांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जयंतीदिनी १ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यस्तरीय युवा संमेलन घेण्याचा निर्धार केला आहे.

खगोलविज्ञानाच्या जनजागृतीचे काम गेली पंधरा वर्षे सातत्याने सुरू आहे. फिरत्या नभांगणाचा उपक्रम पुन्हा सुरू करण्याचा संकल्प पदाधिकाऱ्यांनी केला. जाती-अंत संकल्प विभागांतर्गत विविध कार्यशाळा आणि उपक्रम संपन्न झाले. जोडीदाराची विवेकी निवड उपक्रमाच्या राज्यभर कार्यशाळा झाल्या, पुढील काळातही त्या होणार आहेत. महाराष्ट्र अंनिसचे मुखपत्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका याबाबत सविस्तर चर्चा झाली. सध्या या मासिकाचे पाच हजार वर्गणीदार आहेत ते दुप्पट करण्याचा ठाम निर्धार केला गेला. प्रत्येक महिन्यात मासिकासाठी जाहिराती आणि देणग्या गोळा करण्याचे नियोजन झाले. पत्रिकेचा गुणात्मक दर्जा राखण्याबाबत संपादक मंडळांनी कार्यकर्त्यांना आश्वासित केले. बहुसंख्य कार्यकर्ते हा अंक प्रत्यक्ष वाचकापर्यंत पोहोच करतात. पत्रिकेसाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याचे ठरले.

राज्याबाहेर कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी मागणी होत आहे. छत्तीसगड येथील अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रशिक्षण उत्साहवर्धक झाले. शालेय अभ्यासक्रमात कोणत्याही धर्माचे शिक्षण दिले जाणार नाही अशी भूमिका घेतलेल्या राज्याच्या शिक्षणमंत्री ना. वर्षाताई गायकवाड यांचे राज्य बैठकीत अभिनंदन करण्यात आले. महा. अंनिसचे संघटनात्मक काम अधिक सक्षम, गतिशील होण्यासाठी संघटनात्मक शिबिरे घेण्यात येणार आहेत. संघटनेच्या गरजेनुसार वाढविस्तारासाठी नोंदणीकृत संस्थांची वाढ करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला.

पुस्तक प्रकाशन विभाग अधिक सक्षम करून स्वतंत्र वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे. पुढील तीन महिन्यात नवीन तीन पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहे. गेल्या ३२ वर्षातील बुवाबाजी विरोधी लढयांचे पुर्नलेखन करण्यात येणार आहे. संघटनेची पुढील वाटचाल एकदिलाने, समन्वयाने, संघटितपणे, निर्धाराने करण्याचा संकल्प केला गेला. या बैठकीचे नियोजन पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगर, आकुर्डी, चाकण या शाखांनी उत्कृष्टपणे केले. संयोजनाचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. राज्यभरातून आलेल्या सर्व १५० पदाधिकाऱ्यांनी मृत्यूनंतर देहदान, अवयवदान करण्याचा संकल्प केला. या कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये ही उल्लेखनीय बाब ठरली.

(लेखिका, महा. अंनिसच्या राज्यप्रधान सचिव आहेत.)

●



# तर्कशील सोसायटी पंजाब

गुरमीत सिंह
९४१६०३६२०३

(शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापित केलेल्या 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' या संघटनेला देशभरातील समविचारी संघटना आपली मार्गदर्शक मानतात. २०१९ साली मुंबईत आयोजित केलेल्या महा. अंनिसच्या त्रिदशकपूर्ती महोत्सवात विविध राज्यांतील संघटनांनी उपस्थिती नोंदवली होती. अशा संघटनांची माहिती मिळवून त्यांचा परिचय आम्ही वाचकांना टप्प्याटप्प्याने करून देणार आहोत. पंजाब राज्यातील 'तर्कशील सोसायटी पंजाब' या अग्रगण्य विवेकी संघटनेचा हा परिचय.)

'रॅशनालिस्ट सोसायटी पंजाब' या संघटनेची स्थापना १९८४ साली झाली तेव्हा सोसायटीने 'रॅशनालिस्ट सोसायटी पंजाब' या नावाने काम करणे सुरू केले होते. खरे तर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करणारे लोक मोठ्या संख्येने होते. परंतु डॉ. अब्राहम कोवूर यांच्या 'बिगॉन गॉडमेन' (Begone Godmen) या पुस्तकाचा पंजाबी भाषेत अनुवाद प्रकाशित झाल्यावर तर्कशील सोसायटीचे कार्य बर्नाला (पंजाब) येथून सुरू झाले. डॉ. कोवूर यांचे 'देव पुरुष हार गये' या अनुवादित पुस्तकाच्या डझनावारी आवृत्त्या आत्तापर्यंत प्रकाशित झाल्या आहेत. १९८५ साली या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यावर कोवूर यांच्या पुस्तकांना मागणी येऊ लागली. मग, त्यांचे दुसरे पुस्तकही 'देव, दानव और रूहें' (Gods, Demons and Spirits) या पुस्तकाचा अनुवाद प्रकाशित केला.

सुरूवातीला डॉ. कोवूर यांचेद्वारा अलौकिक शक्तीचा दावा करणाऱ्यांना आव्हान जारी केले गेले. सुरुवातीच्या काळात, तथाकथित अलौकिक शक्तीचा दावा करणाऱ्या लोकांपुढे २३ पैकी कोणत्याही एका दाव्याचे आव्हान कसलीही फसवाफसवी न करता सिद्ध करून दाखवल्यावर रु.१०,०००/- देण्याचे जाहीर करण्यात आले होते. नंतर ही रक्कम वाढवण्यात आली आणि ती रु. पाच लाख एवढी करण्यात आली. गेल्या ३७ वर्षांत कित्येक भोंदू मंडळींनी आव्हान स्वीकारल्याचा दावा केला, परंतु शेवटी पराभूत झाल्यावर जमा केलेली आव्हानाची अनामत रक्कम त्यांना गमावावीलागली.

**भानामतीच्या घटनांची चिकित्सा**

एखादी गूढ घटना घडत असल्यास तर्कशील सोसायटी चिकित्सा करून त्या घटनेमागील वैज्ञानिक सत्य उघड करते. उदा. घरात आग लागणे, दगड विटा पडणे, कपडे फाटणे, कपड्यांवर रक्ताचे डाग येणे, घरातून पैसे किंवा कपडे गायब होणे इत्यादी बाबींची चिकित्सा करून, त्या मागील भूत-प्रेत कल्पनांचा पर्दाफाश करून, कार्यकारण भाव समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकरणांना मनोवैज्ञानिक पद्धतीने सोडविले जाते आणि अशी धारणा दृढ केली जाते की, मृताच्या आत्म्याचे कसलेही अस्तित्वच नसते. भूत नावाचा कसलाही प्रकार नसतो. मनुष्याच्या मृत्यूबरोबरच सर्व काही समाप्त होऊन जाते. त्या नंतरचे कर्मकांड/अनुष्ठान हे केवळ जिवंत असलेल्या सदस्यांना धीर देण्यासाठी किंवा मनोवैज्ञानिक स्वरुपात त्यांना उभारी देण्यासाठी केले जाते. या निष्कर्षानंतरच तर्कशील सोसायटीने मृतदेह वैद्यकीय संशोधनासाठी मेडिकल कॉलेजला प्रदान करण्याचा निर्णय घेतला आणि उपक्रमही चालवला. हे काम जानेवारी २००२ मध्ये तर्कशील सोसायटी पंजाबचे राज्य अध्यक्ष कृष्ण बरगाडी यांच्या मृत्यूनंतर सुरू केले गेले आणि आज हे संपूर्ण पंजाब राज्यात एक आंदोलन म्हणून प्रसिध्द झाले आहे. दरवर्षी मेडिकल कॉलेजमध्ये शेकडो मृतदेह दान केले जात आहेत.

**साहित्य प्रकाशन**

तर्कशील सोसायटी पंजाबने लोकांना वैज्ञानिक विचारांशी जोडून घेण्यासाठी मे १९८६ पासून 'तर्कशील' पत्रिकांचे प्रकाशन सुरू केले आहे. काही वर्षे ही पत्रिका 'वैज्ञानिक विचार' या नावाने प्रकाशित होत होती. सन २००० पासून ती 'तर्कशील' या नावाने प्रकाशित होत आहे. नंतर ती हिंदी भाषेत सुद्धा प्रकाशित केली जात आहे. पंजाबी भाषेत प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांत ती प्रथम क्रमांकावर आहे. याशिवाय, सुमारे पन्नास पुस्तके तर्कशील सोसायटीद्वारा प्रकाशित केली गेली आहेत.

**मालिका, ऑडिओ, व्हिडिओ कॅसेट**

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी, सोसायटीने २००७ साली जालंधर दूरदर्शनवर आणि २०१० साली चढ्डी कला टाइम टीव्ही चॅनेलवर एक मालिका 'तर्क दा सान ते' प्रसारित केली आहे. या मालिकेच्या हजारो प्रती बनवल्या गेल्या आणि वितरित केल्या गेल्या. विविध कुप्रथांच्या विरोधात लोकांचे प्रबोधन करण्यासाठी गाव / शहरे / शाळा / कॉलेजांमध्ये जादूचे खेळ, नाटक मेळावे आणि यात्रा आयोजित केले जातात. याशिवाय, विविध विषयांवर ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स सुद्धा तयार केल्या जातात.

कार्यालयातून किंवा तर्कशील साहित्य व्हॅनमधून त्या मिळवल्या जाऊ शकतात.

**तर्कशील साहित्य व्हॅन**



तर्कशील सोसायटी पंजाबने जानेवारी २०१४ पासून एक मोबाइल साहित्य व्हॅन बनवली आहे. जी दररोज शाळा, कॉलेज, गाव, शहरांमध्ये फिरते. ही व्हॅन विद्यार्थी आणि जनतेला स्वस्त किमतीत चांगली पुस्तके उपलब्ध करून देते. यामध्ये साऊंड सिस्टिम आणि मॅजिक किट सुद्धा आहेत. सोसायटीचे कार्यकर्ते नेहमी विविध प्रकारांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आणि लोकांनी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा मार्ग अनुसरावा यासाठी प्रयत्न करीत असतात. ही व्हॅन आपल्या ठरलेल्या वेळापत्रकानुसार आणि विशेष आमंत्रणावरून शाळा/कॉलेज/गाव/शहर इत्यादी ठिकाणी पोहोचते.



**आंतरराष्ट्रीय समन्वय**

देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावाने कार्य करणार्याइ विवेकी आणि विज्ञानाशी संबंधित संस्थांसोबत समन्वय साधला जातो. तसेच तर्कशील सोसायटी पंजाब ही संघटना अखिल भारतीय तर्कशील महासंघाचा (Federation of Indian Rationalist Associations) एक महत्वपूर्ण भाग आहे. अशाच प्रकारे तर्कशील सोसायटी पंजाब नियमितपणे परदेशात स्थापित झालेल्या बुद्धिवादी संघटनांसोबत समन्वय साधते आणि सहकार्य करते.

**तर्कशील सोसायटीला मिळालेले सन्मान**

१) वैज्ञानिक रुचि राम साहनी मेमोरिअल ट्रस्टने २१ ऑगस्ट, १९९३ रोजी सन्मानित केले. विशेष उपस्थिती: डॉ. नीलम गुलाटी, वरिष्ठ अधिकारी, विज्ञान आणि प्रौद्यौगिकी विभाग, पंजाब आणि डॉ. नरेंद्र सहगल, संयुक्त सल्लागार, राष्ट्रीय विज्ञान आणि प्रौद्यौगिकी परिषद, नवी दिल्ली. देशभक्त यादगार हॉल, जालंधर येथे सन्मानित केले गेले.

२) शाळांमध्ये जादूचे प्रयोग करण्यासाठी उत्तर क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, पतियालाकडून विशेष अनुदान आणि यमुनानगर (हरियाणा) येथे सार्क देशांद्वारा आयोजित मॅजिक फेस्टिव्हल–१९९५मध्ये सहभागी होण्यासाठी सोसायटीच्या पाच सदस्यांचे नामांकन केले गेले होते.

३) पंजाबी सथ्थ लांबडा द्वारा सन्मानित

४) २७ जानेवारी २०१९ रोजी बालरंग मंदिर सभागृह, पुणे (महाराष्ट्र) येथे डॉ. नरेंद्र दाभोलकर मेमोरिअल अवार्ड २०१८ व रू. १ लाख हा सन्मान मिळवणारी महाराष्ट्राबाहेरील तर्कशील सोसायटी पंजाब ही पहिलीच संघटना. प्रसिद्ध फिल्म निर्माते अमोल पालेकर यांच्या हस्ते हा अवार्ड प्रदान केला गेला होता.

अनुवाद: उत्तम जोगदंड (९९२०१२८६२८)

●

## चंद्रवीर सावळे यांना अभिवादन



नुकतेच चंद्रवीर सावळे यांचे दुःख निधन झाले. तडफदार कार्यकर्त्यांच्या जाण्याने कार्यकर्ते हळहळले. चंद्रवीर हे अनेक संस्था संघटनांच्या कामाशी जोडलेले होते. अंनिसच्या संविधान बांधिलकी महोत्सवात चंद्रवीर सहभागी होते. धुळे महानगर नागरी संयोजन समिती, प्राच्य विद्या पंडीत कॉम्रेड शरद पाटील प्रणित सत्यशोधक संघटन, अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन, अन्याय अत्याचार विरोधी संघटना, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नगर राज बिल समर्थन मंच आणि व्यसन मुक्त महाराष्ट्र समन्वय मंच यांसह पुरोगामी संघटना, संस्था आणि राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी संपर्क, समन्वय साधणारा लढावू, पुर्ण वेळ सामाजिक कार्यकर्ता होता. चंद्रवीर यांना महाराष्ट्र अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली !



# विविध उपक्रमांच्या वाटेवर

अनिल शोभना वसंत
९८२३२८०३२७

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विविध उपक्रम विभाग आयोजित एप्रिल महिन्यातील महत्वाचा उपक्रम सामाजिक समता सप्ताह अभियान संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हा-जिल्ह्यात जोमाने राबविले गेले. मे महिन्यात प्रामुख्याने १ मे - महाराष्ट्र दिन (कामगार दिन) अभियान तसेच साहस शिबीर २०२२ (Summer Camp 2022)आणि महा-अंनिस कुटुंब मेळावा २०२२ असे तीन उपक्रम शाखांमध्ये आयोजित करू शकतो.

**१ मे-महाराष्ट्र दिन (कामगार दिन) अभियान**

१ मे १९६० रोजी भाषावार प्रांतरचनेच्या सूत्रातून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. हे जरी खरे असले तरी भाषावाद व प्रांतवादाला थारा न देता राष्ट्रीय एकात्मता जपण्याची मानसिकता जनमानसात तयार करण्यासाठी पोस्टर प्रदर्शन तसेच व्याख्यानाचे आयोजन शाखांमध्ये करू शकता.

एक मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा केला जातो त्या निमित्ताने कामगारांच्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करावे. या कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती आरोग्य या विषयाबाबत व्याख्यानाद्वारे मांडणी करावी. ध्वजारोहणाचा कार्यक्रम केल्यास कामगारांच्या हस्ते तो घडवून आणावा. त्यानिमित्ताने कामगार संघटनांची संपर्क वाढविणे, त्यांच्या कार्यकर्त्यांशी, नेत्यांशी परीचय संवाद वाढविणे हे आपण करू शकता.

**साहस शिबीर २०२२**

विद्यार्थ्यांमध्ये मनोरंजनाबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोनाचे संस्कार व्हावे हा उद्देश ठेवून मे महिन्यातील सुट्टीतला कोणत्याही दिवशी, १-२ दिवसाचे साहस शिबीर (Summer Camp 2022) आयोजित करावे. महा-अंनिसची पनवेल शाखा गेली १७ वर्षे असे नावीन्यपूर्ण शिबीर यशस्वीपणे आयोजित करीत आहे आणि या शिबिराच्या माध्यमातून त्यांना शाखेसाठी क्रियाशील कार्यकर्ते लाभले आहेत.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी शाळा, महाविद्यालयात संपर्क करावा, शिबिराचे ठिकाण ठरवावे, आकाश दर्शन, सर्प विज्ञान, स्व-संरक्षण, चमत्कार, व्यक्तिमत्व विकास, धम्माल खेळ या साठी तज्ञांशी संपर्क करणे. या शिबिरात आपण विद्यार्थ्यांसाठी आपल्या सोयीनुसार रॅपलिंग, व्हॅलिक्रॉसिंग, लाठीकाठी, खगोल विज्ञान वआकाश दर्शन, चमत्कारामागील विज्ञान, आपत्कालीन व्यवस्थापन, फायर फायटिंग, बैलगाडीतून सफर, मातीकाम (पॉटरी), शरीर विज्ञान, विविध कला गुणदर्शन, मनोरंजक खेळातून व्यक्तीमत्व विकास, पथनाट्य, चर्चासत्र या सारखे आकर्षक विषय ठेवू शकतो.

**महा-अंनिस कुटुंब मेळावा २०२२**

जोपर्यंत कार्यकर्ता व त्यांचे कुटुंबीय तसेच सर्व कार्यकर्ते व त्यांची कुटुंबीये यांच्यात परस्पर सुसंवादाचे, आपुलकीचे नाते तयार होत नाही तोपर्यंत शाखेची बांधणी नीट झाली आहे असे म्हणता येत नाही. कुटुंबातील अन्य सदस्यांनाही हे माहिती असायला हवे की कोण आहेत असे कार्यकर्ते, ही काय स्वरूपाची कामे करतात वगैरे. अशासाठी कुटुंब मेळाव्याचे आयोजन करणे अपेक्षित आहे. कुटुंब मेळावा हा एखाद्या पर्यटन स्थळी, शेतात, फार्म हाऊसवर अशा सोयीच्या व विरंगुळा वाटेल अशा जागी ठरवावा. सर्व कार्यकर्त्यांनी- आपल्या संपूर्ण कुटुंबासह येणे अनिवार्य करावे. कुटुंब मेळावा हा कार्यकर्त्यांनी कुटुंबीयांनी परस्पर चर्चा करणे, परीचय करून घेणे यासाठी ही असतो, म्हणून हा पूर्ण दिवसभराचा कार्यक्रम ठेवावा. दिवसभर गप्पा गोष्टी, गाणी, धम्माल खेळ, जेवण असा हा मोकळाढाकळा कार्यक्रम असावा. यात समिति विषयी थोडक्यात माहिती देवून, कुटुंबियांच्या सहकार्यामुळेच आम्ही कार्यकर्ते महा-अंनिसचे कार्य करू शकतो याबद्दल कुटुंबीयांचे मनःपूर्वक आभार मानावेत. कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या विषयी काय वाटते, अंनिसच्या चळवळी बाबत काय वाटते अशीही चर्चा मेळाव्यात घडवून आणावी आणि हा मेळावा यशस्वी करावा.

चला, आपण विविध उपक्रमाच्या कालसुसंगत आणि वेगळ्या वाटा शोधून, विवेकी विचारांचा प्रचार आणि प्रसार करूया.

(महा. अंनिसच्या विविध उपक्रम विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)

•

**विचारधन**

- अंधश्रद्धा हा श्रद्धेच्या क्षेत्रातील काळा बाजार असतो आणि काळाबाजार करणाऱ्या व्यक्तीचा धर्म पाहण्याची गरज नसते.

**- शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर**



# महाराष्ट्र अंनिसची खबरबात

विशाल विमल
७२७६५५९३१८

## ‘होळी करा लहान, पोळी करा दान’ उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद




**ठाणे :** जिल्ह्यातील कल्याण, डोंबिवली आणि भिवंडी या शाखांतील कार्यकर्त्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. कल्याण पूर्वेतील शिवसमर्थ कॉलनी, वक्रतुंड प्लाझा, गुरुदत्त अपार्टमेंट, विघ्नहर्ता कॉलनी, आई गावदेवी सोसायटी, श्री ज्योतिर्लिंग सोसायटी, द्वारकामाई प्लाझा, श्रीराम मित्रमंडळ येथील होलिकोत्सव मंडळांनी तसेच कल्याण पश्चिमेतील काही संकुलांतील नागरिकांनी महा. अंनिसच्या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यांनी महा. अंनिसचे कार्यकर्ते डॉ. सुषमा बसवंत, शरद लोखंडे, राजेश देवरुखकर, संतोष मात्रे, कृष्णा पवार, उत्तम जोगदंड यांच्याकडे एकूण सुमारे ५०० पुरणपोळ्या गोळा करून दिल्या. वालधुनी परिसरातील होलिकोत्सव मंडळांकडून महा. अंनिसचे कार्यकर्ते रोहित डोळस, प्रवीण पाठारे, नितीन वानखेडे आणि ए. सी. साहू यांनी पुरणपोळ्या गोळा केल्या. नंतर या पोळ्यांचे वाटप कल्याण स्टेशन, बस स्टॅण्ड, आंबेडकर उद्यान परिसरातील फुटपाथवर राहणार्या गरीब लोकांना करण्यात आहे. महा. अंनिसच्या डोंबिवली शाखेतर्फे डोंबिवली पश्चिम येथील गावदेवी शाळेत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. त्यांनी दान दिलेल्या पोळ्या स्वीकारण्यात आल्या. या पोळ्यांचे वाटप डोंबिवली रेल्वे स्टेशन, अन्य वस्त्या, कचरावेचक वस्ती तसेच फुटपाथवर राहणार्या गरीब लोकांमध्ये करण्यात आले. भिवंडी शाखेचे कार्यकर्ते विनोद म्हात्रे यांनी आडगाव विद्या मंदिर या कोनगाव येथील शाळेत पर्यावरण पूरक होळी व रंगपंचमी कशी साजरी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. संध्याकाळी विविध होलिकोत्सव मंडळांकडून पुरणपोळया स्वीकारण्यात आल्या आणि त्यांचे वाटप विनोद म्हात्रे, गणेश शेलार, सुरेश साळवे, संतोष म्हात्रे, पि बी मोरे या कार्यकर्त्यांनी गरीब वस्तीत केले. या उपक्रमाबद्दल सर्व होलिकोत्सव मंडळांनी आणि संबंधित नागरिकांनी आनंद व्यक्त केला, अशी माहिती राजेश देवरुखकर, उत्तम जोगदंड यांनी दिली.

**नवी मुंबई :** महाराष्ट्र अंनिसच्या सानपाडा शाखेतर्फे ज्ञानदीप कनिष्ठ महाविद्यालय, सेक्टर ४ मधील प्राथमिक विद्यालय विवेकानंद संकुल, वाशी येथील रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल आणि ज्युनियर कॉलेज, वाशीगाव येथील प्राथमिक शाळा क्रमांक २७ येथील विद्यार्थ्यांशी पर्यावरण पूरक होळीसंबंधी संवाद साधण्यात आला. अशोक निकम यांनी संवाद साधला. यावेळी प्राचार्य पी पी पाटील, प्राचार्या एस एस भोसले, मराठी माध्यमिक विभाग प्रमुख वाघ सर, मुख्याध्यापिका मिसाळकर आदी उपस्थित होते. नवी मुंबईत विविध ठिकाणी पोळ्या गोळा करून त्या गरजूंना वाटप केल्या. माधवी देशमुख यांच्या सहकार्याने दिघा येथील ग्रीन वर्ल्ड सोसायटीतून पोळ्या गोळा करून रबाले येथील गरजूंना वाटप करण्यात आल्या. पांडुरंग सरोदे यांनी गिरमकर साहेबांच्या माध्यमातून उलवे येथील उन्नती सोसायटीच्या रहिवाशांना आवाहन करून नैवेद्याच्या ६५० पोळ्या होळीत अर्पण न करता गरिबांना देण्यासाठी गोळा केल्या. गरीब मजूरांना त्यांचे वाटप करण्यात आले. सानपाडा येथील *समाजसेवक बाबाजी इंदोरे साहेब व त्यांच्या मित्रपरिवाराच्या सहकार्याने सानपाडा येथील ३१ सोसायटयांमधून, १००० नैवेद्याच्या पोळ्या गोळा करून सानपाडा व तुर्भे येथील गरजूंना वाटप करण्यात आल्या. बाबाजी इंदोरे, विशाल उघडे व सुगत पनाड यांनी स्वत:च्या वाहनांतून पोळ्या गोळा केल्या. हेमलता देशपांडे, वंदना सरोदे, दिव्या सरोदे, प्रेम सरोदे, किरण जोशी, प्रकाश माळवे, जे. डी. गवई, गजानंद जाधव, किरण वाळुंज व अशोक निकम यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

**अलिबाग :** महाराष्ट्र अंनिसच्या अलिबाग शाखा व सुरभी स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चौढी येथील आदिवासी वाडीवर होळी निमित्ताने पुरणपोळी आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सुरभी संस्थेच्या अध्यक्षा सुप्रिया जेधे यांनी गीत गाऊन मुलांचे स्वागत केले. महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस नितीन राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या उपाध्यक्षा निर्मला फुलगावकर, नंदु तळकर, शुभांगी जोगळेकर पानस्कर, शांताराम राऊत, प्रिया सोलंकी, आदिवासी वाडीतील अंगणवाडी सेविका वंदना नाईक यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**नाशिक :** नाशिक रोड येथील आनंद भक्ती इमारत, दत्त मंदिर या भागातून कार्यकर्त्यांनी पोळ्या मिळवल्या आणि त्या नाशिक रोड पुलाखालील व रेल्वे स्टेशन वरील गोरगरीबांना वाटल्या. जुनी पंडित कॉलनी, नाशिक येथून पोळ्यांचे संकलन करून त्यांचे जुना गंगापूर नाका परिसरातील गोरगरीबांना वाटप करण्यात आले. कामगार नगर, सातपूर तसेच सुयोग कॉलनी, आनंदवली भागातून पुरणपोळ्या जमा करून त्यांचे परराज्यातील पुरुष कामगार तसेच रस्त्याचे खोदकाम करून उघड्यावर राहणाऱ्या मजूरांच्या कुटुंबांमध्ये वाटप केले. कार्यकर्त्यांनी गरीब-गरजूंना केवळ पोळ्यांचे वाटप न करता त्यांच्या सोबत स्वतः देखील पोळ्यांचा आस्वाद घेत होळीचा उत्सव साजरा केला. राज्य सरचिटणीस डॉ. ठकसेन गोराणे, राज्य सदस्य राजेंद्र फेगडे, बुवाबाजी विरोधी संघर्ष जिल्हा सचिव महेंद्र दातरंगे, नाशिक रोड अंनिसच्या शाखेचे कार्याध्यक्ष अरूण घोडेराव आदींनी सहभाग घेतला.

# १५० कार्यकर्त्यांचा देहदान अवयवदानाचा संकल्प



**पुणे :** २३ मार्च हा भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांचा स्मृती दिवस आहे. हा दिवस बलिदान दिवस म्हणून पाळला जातो, त्या शहिदाना अभिवादन समाज-उपयोगी कृतीने व्हावे, यासाठी सर्वांनी देहदानाचा व अवयव-दानाचा संकल्प करावा आणि याबाबतीत जनजागृती व्हावी म्हणून महाराष्ट्र अंनिसच्यावतीने २३ मार्च ते ३० मार्च दरम्यान देहदान अवयवदान संकल्प अभियान राबविण्यात आले. देहदानाचा उपयोग प्रयोगशाळेत डॉक्टरांच्या प्रशिक्षणासाठी व संशोधनासाठी होतो. जिवंतपणी किंवा मृत झाल्यानंतर आपले अवयव दुसऱ्या व्यक्तीला देणे म्हणजे अवयवदान. एक अवयव-दाता ८ जणांचे प्राण वाचवू शकतो, हा उद्देश समोर ठेवून हे अभियान राबविले गेले. महाराष्ट्र अंनिसच्या पुणे येथील राज्य कार्यकारिणी बैठकीत १५० पदाधिकारी - कार्यकर्त्यांनी देहदान अवयवदानाचा संकल्प केला आणि संकल्पपत्र भरून दिले

**नाशिक :** येथील कार्यकर्ते डॉ. ठाकसेन गोराणे, विजया गोराणे, कृष्णा चांदगुडे, महेंद्र दातरंगे, ॲड. समोर शिंदे, नितीन बागुल आदी कार्यकर्त्यांनी अववयदान - देहदानाचे फॉर्म भरून दिले. डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महा-विद्यालयाकडे हे फॉर्म भरून दिले आहेत.

# निबंध स्पर्धेत साक्षी गाडेकर प्रथम

**भंडारा :** महाराष्ट्र अंनिसच्या भंडारा जिल्हा शाखेच्या वतीने 'महिला व अंधश्रद्धा' या विषयावर घेतलेल्या निबंध स्पर्धेत साक्षी गाडेकर हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

द्वितीय कु. प्राची दिनेश मरस्कोल्हे, तृतीय कु. दामिनी ग्यानीवंत तितरमारे, प्रोत्साहनपर कु. अलिशा निलेश गडपाले, कु. शितल ईश्वर धुडसे, छगनलाल पारधी, कु. नव्या आनंद गजभिये, कु. रोशना राजेश पारधी, कु. अर्पिता आनंद गजभिये यांनी क्रमांक प्राप्त पटकाविले आहेत.

# शिक्षक प्रशिक्षण शिबिर

**नाशिक :** महाराष्ट्र अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पांतर्गत शिक्षक प्रशिक्षण शिबिर पार पडले. शासकीय अध्यापिका विद्यालय, नाशिक येथे हे शिबिर झाले. डॉ. ठकसेन गोराणे, कृष्णा चांदगुडे, ॲड समीर शिंदे, महेंद्र दातरंगे, प्रा. डॉ. सुदेश घोडेराव आदी यावेळी उपस्थित होते.

# 'जयभीम जलसा'

**इस्लामपूर :** येथील महाराष्ट्र अंनिस शाखा आणि तक्षशीला ज्ञान केंद्राच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जयभीम जलसा हा कार्यक्रम झाला. नामवंत संगीतकार, गीतकार, गायक डॉ. जयभीम शिंदे यांनी गीते सादर केली. विजया कांबळे, स्वाती शिंदे, संविधान कांबळे, जयभीम शिंदे यांनी भिमगिते सादर केली. यावेळी विशेष प्रावीण्य मिळवलेले डॉ. सुरभी दिलीप सावंत, केवल उद्धव वेटम, डॉ. आशिष आबासाहेब काळे, डॉ प्रा. प्रकाश गायकवाड आदींचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक संजय बनसोडे यांनी केले.

# निमगुळ येथे विविध उपक्रम

**धुळे :** महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे, असे जागतिक महिला दिनानिमित्त निमगुळ गावात झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप खिंवसरा यांनी सांगितले.

तसेच अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस यांच्याशी संवाद साधला. सरकारने किराणामाल व सुपर शॉपमध्ये वाईन विक्रीस परवानगी दिली आहे. या व्यसनवर्धक नीतीला प्रखर विरोध निमगुळच्या अंगण-वाडीसेविका यांनी केला आहे. त्यानिमित्त त्यांनी मुख्य-मंत्र्यांना पोस्टकार्ड पाठवले आहे. कुमोदिनी पाटील, अनिता सूर्यवंशी, सुरेखा निकम, सुरेखा पाटील, सुनीता मराठे, वर्षा पाटील, छाया चित्ते, उषा मराठे आदी यावेळी उपस्थित होत्या. निमगूळ येथे पर्यावरण पूरक होळी करण्यात आली.

महिलांनी झाडांच्या रोपांचे पूजन करून झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. खासदार सुभाष भामरे, आमदार कुणाल बाबा पाटील हे निमगुळ येथे कार्यक्रमा-साठी आले असताना त्यांचे अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका विशेषांक देऊन स्वागत केले, अशी माहिती दिलीप खिंवसरा यांनी दिली.

# चमत्कारातून प्रबोधन

**नाशिक :** मौजे धरमवाडी (ता. मालेगाव) या ठिकाणी रामनवमीनिमित्त पी. एस. खंदारे, सखाराम शिंदे, अशोक भोंडणे, पंडित पाखरे, गोविंदा भोंडणे, सतीश भोंडणे, उल्हास भोंडणे, दीपक कुरकुटे सर्वांनी मिळून चमत्कार सादर केले.

# कौमार्य चाचणी रोखण्यात यश

**जळगाव :** शहरातील सिंधी कॉलनी परिसरात एका उच्च शिक्षितांचा विवाह पार पडला. वर वैद्यकीय क्षेत्रात तर वधु औषधनिर्माण शास्त्राची पदवीधर आहे. विवाह सोहळ्यानंतर कौमार्य चाचणी होणार असल्याची तक्रार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिति जळगाव शाखेकडे आली होती. अंनिसने पोलिसांच्या माध्यमातून कौमार्य चाचणी रोखण्यासाठी रितसर पोलिस अधीक्षक यांना लेखी तक्रार केली आणि पाठपुरावा केला. दरम्यान संबंधित वरीष्ठ पोलिस निरीक्षक प्रकाश शिकारे यांनी वधुवर पक्षातील जबाबदार नागरिक व पंचांना समज दिली. त्यामुळे ही चाचणी रोखली गेली. अंनिसचे कार्यकर्ते विश्वजीत चौधरी, जितेंद्र धनगर,ॲड.भरत गुजर व दिगंबर कट्यारे यांनी विशेष परिश्रम घेतले. कृष्णा चांदगुडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**माहिती पाठवण्याचे आवाहन**

**'महाराष्ट्र अंनिस खबरबात' सदरासाठी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शाखांनी उपक्रमांचे फोटो, मजकूर पाठवावेत.**
**संपर्क : ७२७६५५९३१८**
**विशाल विमल**

# वर्धा जिल्ह्यात आंदोलन, व्याख्याने, चमत्कार सादरीकरण आदी कार्यक्रम

**वर्धा :** बडबडगीतांच्या माध्यमातून 'संवाद संविधानाचा' या विषयावर महाराष्ट्र अंनिसच्या वर्धा जिल्हा शाखेचे पदाधिकारी निखिल जवादे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. हा कार्यक्रम दोन शाळांमध्ये झाला. नागपूर विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबीरात हिंगणघाट येथे वर्धा जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. माधुरी झाडे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन केले.

नागपूर विद्यापीठ अंतर्गत लोक महाविद्यालच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबीरात दत्तपुर, वर्धा येथे राज्यप्रधानसचिव गजेंद्र सुरकार यांनी स्वामी विवेकानंद आणि अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर मार्गदर्शन केले. वर्धा जिल्हा प्रधान सचिव सचिन मेश्राम यांनी चमत्काराचे सादरीकरण केले. युवा विभागाचे सहकार्यवाह निखिल जवादे उपस्थित होते. नागपूर विद्यापीठ अंतर्गत असलेल्या अनिकेत समाजकार्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबीरामध्ये पिपरी मेघे येथे अंधश्रद्धा निर्मूलनातून विज्ञानाकडे या विषयावर राज्यप्रधानसचिव गजेंद्र सुरकार यांनी मार्गदर्शन केले. वर्धा जिल्हा प्रधान सचिव सचिन मेश्राम यांनी चमत्काराचे सादरीकरण केले. वर्धा जिल्हा पदा-धिकारी व कार्यकर्त्यांनी रहदारीच्या बजाज चौकात आम्ही युध्दग्रस्त युक्रेनच्या नागरिकांसोबत आहोत अशी वाक्य लिहिलेले पोष्टर हातात घेऊन सपोर्ट व्यक्त केला. वर्धा जिल्हा व तालुका शाखा वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने चार ठिकाणी पुरणपोळी संकलीत करून बजाज चौक, रेल्वे स्टेशन, इतवारा येथील पारधी बेढा या ठिकाणी वाटप करण्यात आले, अशी माहिती गजेंद्र सुरकार यांनी दिली. स्थानिक इंगळे नगरी येथे महाराष्ट्र अंनिसने जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेतला होता. यावेळी कार्याध्यक्ष माधुरी झाडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात जयश्री देशमुख, श्रीमती वाघ, माधुरी उंबरकर, अस्मिता, जयश्री राऊत, श्रीमती दांदडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ज्योती गुंडापुरे या कार्य-क्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. कार्यक्रमाचे संचालन प्रीती येळणे यांनी केले तर आभार कविता राठोड यांनी आभार मानले.




विद्यार्थ्यांशी संवाद साधताना राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार



व्याख्यानात बोलताना जिल्हा कार्याध्यक्ष माधुरी झाडे

कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी निःशुल्क चमत्कार शिकविण्याचे प्रशिक्षण शिबीर वर्धा वर्धन हाट झुनका भाकर केंद्र येथे आयोजित करण्यात आले. आजही समाजात, राजकीय, सिने क्षेत्रात चमत्काराला नमस्कार करणारे, ते मान्य करुन चमत्कार करणाऱ्या बुवा, बापू, देवी, माता यांच्या पायी लोटांगण घालतात, ते कशी बदमाशी करून कसे सर्वसामान्यांना फसवितात हे समजावे म्हणुन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या चमत्कार प्रशिक्षण शिबीरात मंत्राने लोखंडी लंगर सोडवणे, जळता कापूर हातात खेळवून तोंडात गिळणे, गडव्यात भुत पकडने, करणी, भानामती, जादू करणा यांचे नांव काढून दाखविणे, पाणी मंत्राने गोड करणे आदी चमत्कार शिकवून ते करवून घेतले व सादरीकरण करुन घेतले. राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, जिल्हा प्रधान सचिव सचिन मेश्राम, निखिल जवादे या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी प्रशिक्षण दिले. जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. माधुरी झाडे, युवा विभागाचे कार्यवाह प्रा. प्रितेश म्हैसकर, सुनिल ढाले आदी उपस्थित होते.

# आंतरजातीय सत्यशोधकी विवाह संपन्न

**लातूर :** महाराष्ट्र अंनिसच्या लातूर शाखेच्या वतीने ३०५ वा




आंतरजातीय सत्यशोधकी विवाह संपन्न झाला. वर – आशिष लामतुरे व वधू – निलीमा चौधरी हे दोघेही एका आय टी कंपनीत नोकरी करतात. निलीमाच्या कुटुंबामध्ये आईसह दोघे भाऊ असा परिवार असून आईचा या लग्नाला पाठींबा होता. आशिष यांच्या कुटुंबामध्ये वडील, आई, भाऊ असा परिवार आहे. ३ एप्रिल २०२२ रोजी सायंकाळी ठिक ६ वाजता हा विवाह हॉटेल अंजनी शिवाजी चौक लातूर येथे पार पडला. प्रा. दशरथ भिसे, अनिरूध्द व भारती लामतुरे, सुनिता अरळीकर, रामकुमार रायवाडीकर, अनिल दरेकर, माधव बावगे, प्रा. अनंत लांडगे, रुक्साना मुल्ला, बाबा हलकुडे, बलभीम कोथींबीरे, दिलीप अरळीकर, ॲड. मधुकर कांबळे, अनिरूध्द वाघमारे, ॲड. मनोहरराव गोमारे, अपूर्वा लामतुरे, अनंत लांडगे, सुधीर भोसले, सचिन औरंगे, देवराज लंगोटे, नेताजी जाधव, रणजित आचार्य, ॲड. सुरेश सलगरे, हनुमंत मुंढे, डि एन भालेराव, रामराव गवळी, बी आर पाटील, श्रावणकुमार चिद्री, शाम वरियानी, ॲड. सुधाकर अरसुडे, संजय व्यवहारे, गणपतराव तेलंगे, सुरज पाटील, बुध्दीसार सिकरे, रामचंद्र तांदळे, अजय सुर्यवंशी, प्रा. सुधीर अनवले आदी उपस्थित होते.

# चमत्कार सादरीकरण

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबीरात गडचिरोली जिल्हा शाखेचे जिल्हाकार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे यांनी चमत्काराचे सादरीकरण केले. विलास निंभोरकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन विषयावर मार्गदर्शन केले.

# विवेक-विज्ञान शब्दकोडे क्र. १



(रचना : उत्तम जोगदंड)

**आडवे शब्द**

१) महाराष्ट्राचे एक परिवर्तनवादी महान संत
३) सूर्यमालेतील एक ग्रह
५) मेंदूला गंभीर इजा झाल्यास माणूस ..त जातो
७) वनस्पतीची रोपे तयार करण्याचे ठिकाण
९) जादूटोण्याचा एक प्रकार
१०) उडणारे सजीव
११) एक मानसिक गंड
१३) नसलेल्या गोष्टी दिसणे
१५) अंनिसच्या लोगोमधील तीन शब्दांपैकी पहिला शब्द
१८) यातून रोप अंकुरते
२०) पृथ्वीचा आकार
२१) 'बोल्ट'चा साथीदार
२२) इंजिनाची शक्ति मोजण्याचे एकक
२३) पर्यावरणासाठी याचे रक्षण करावे
२४) दोन प्रजातीतून तिसरी प्रजाती तयार करणे

**उभे शब्द**

२) वैज्ञानिक दृष्टिकोण एका शब्दात
४) विवाहित स्त्रियांचा बळी घेणारी अघोरी प्रथा
५) जगाला गेल्या दोन वर्षांपासून या विषाणूने ग्रासले आहे
६) मोजण्याचे परिमाण
८) हे केले तर वाचाल
११) गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारा शास्त्रज्ञ
१२) लोखंड प्राणवायूसोबत आल्यास हे होते
१४) अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे अध्वर्यू
१६) संस्कृत भाषेतील ज्ञान प्राकृत भाषेत आणणारे संत
१७) पृथ्वीवरील सर्वात प्रगत प्राणी
१९) याचे स्वातंत्र्य संविधानात आहे
(उत्तर पुढील अंकात)

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

# राज्य कार्यकारिणी बैठक : पुणे : क्षणचित्रे



इतिहास अभ्यासक डॉ. देवकुमार अहिरे, नोईंग गांधीझमचे संकेत मुनोत यांनी बैठकीला सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत लालचंद कुवर यांनी केले.



समाज विज्ञान अकादमीचे कॉ.दत्ता देसाई यांनी बैठकीस सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत संजय बनसोडे यांनी केले.



माहिती अधिकार कार्यकर्ते विवेक वेलणकर यांनी बैठकीस सदिच्छ भेट दिली.



काँग्रेसच्या नेत्या सोनाली मारणे यांनी बैठकीला सदिच्छ भेट दिली.




अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका : एप्रिल २०२२ मासिकाचे प्रकाशन महाराष्ट्र अंनिसच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. यावेळी विशाल विमल, उत्तम जोगदंड, संजय बनसोडे, नितीन शिंदे, सुशिला मुंडे, अजय भालकर, माधव बावगे, राजेंद्र फेगडे, एकनाथ पाटील, शामसुंदर मिरजकर, ठकसेन गोराणे उपस्थित होते.



राज्य कार्यकारिणी बैठकीचे संयोजन महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर पुणे, आकुर्डी, चाकण आणि जिल्हा शाखेने केले. कार्यकर्त्यांचा राज्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# संघटनेचा लोकशाही उत्सव

## राज्य कार्यकारिणी निवडप्रक्रिया सुरु

विज्ञान निर्भयता नीती

आम्ही वारस विवेकाचे

### तीन वर्षांसाठी राज्य कार्यकारिणी निवड

महाराष्ट्र अंनिसची निवड करावयाची राज्य कार्यकारिणी ही जून २०२२ ते मे २०२५ या तीन वर्षांसाठी असेल.

९ ऑगस्ट १९८९ रोजी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. या संघटनेला ३२ वर्षे पूर्ण झाली आहेत. गेल्या ३२ वर्षांपासून संघटनेची राज्य कार्यकारिणी पदाधिकारी निवड प्रक्रिया दर तीन वर्षांनी राबवली जाते. संघटनेत शाखा कार्यकारणीची मुदत १ वर्ष, जिल्हा कार्यकारणीची मुदत २ वर्ष व राज्य कार्यकारिणीची मुदत ३ वर्षांची आहे. संघटनाअंतर्गत कार्यकर्त्यांच्या अनुभवातून आणि सहभागातून ही निवड प्रक्रिया विकसित करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र अंनिस संघटनेसाठी आनंद आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे आजपर्यंत ही निवड प्रक्रिया कार्यकर्त्यांनी सर्व सहमतीला पसंती दिली. विद्यमान राज्य कार्यकारणी पदाधिकारी निवड ही जून २०१९ साली पुणे जिल्ह्यातील भोर येथे झालेली होती. संघटनेच्या स्थापनेपासूनचे अध्यक्ष राहिलेले दिवंगत प्रा. डॉ. एन .डी. पाटील सर या निवड सहमती समितीचे अध्यक्ष होते आणि ते स्वतः बैठकीसाठी हजर देखील होते. या राज्य कार्यकारिणीची मुदत मे २०२२ अखेर संपत आहे. पुढील तीन वर्षांसाठीची राज्य कार्यकारिणी पदाधिकारी निवड प्रक्रिया ही ३२ वर्षांप्रमाणेच राज्य–जिल्हा–शाखा या त्रिस्तरावरील सक्रिय कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या सहभागातून होत आहे. १५ एप्रिल २०२२ ते ३१ मे २०२२ दरम्यान ही नवीन राज्य कार्यकारिणीची पदाधिकारी निवड प्रक्रिया संघटनाअंतर्गत सुरू असेल. डॉ. प्रदीप जोशी (ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ, जळगाव) संघटनेचे अनेक वर्ष क्रियाशील हितचिंतक आणि मार्गदर्शक आहेत, ते या निवड सहमती समितीचे अध्यक्ष आहेत. सुशीला मुंडे (मुंबई) या ह्या सहमती निवड समितीच्या सचिव आहेत आणि नितीनकुमार राऊत (रायगड) हे या समितीचे सदस्य आहेत. पुरोगामी महाराष्ट्राला एक चळवळ म्हणून दिशादिग्दर्शक ठरेल असे काम करणारी ही संघटना आहे. नवीन राज्य कार्यकारणी पदाधिकारी निवड प्रक्रिया ही विवेकाचा आवाज अधिक बुलंद करणारी ठरेल, असा विश्वास आहे.

### आता एन डी सरही नाहीत

भाई एन डी पाटील सर हे महाराष्ट्र अंनिसच्या स्थापनेपासून अध्यक्ष आहेत. सरांचे १७ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले. रिक्त झालेल्या अध्यक्षपदी नव्याने नियुक्ती करायची आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नंतर आता एन डी सरही सोबत नसणार आहेत, ही दुःखद गोष्ट असून त्यांच्या कार्याचे, विचारांचे स्मरण करत घोडदौड सुरू ठेवावी लागणार आहे.

### लोकशाही, सहमती आणि एकमताने निवड

महाराष्ट्र अंनिसची गेले बत्तीस वर्षे लोकशाही पद्धतीने पदाधिकारी निवड प्रक्रिया पार पडत आलेली आहे. सर्वसहमतीने आणि एकमताने पदाधिकारी निवडले जातात. या निवड पद्धतीत निवडणूक घेण्याचा पर्याय देखील खुला असतो.

### महाराष्ट्रात ३०० हुन अधिक शाखाद्वारे काम

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात ३०० पेक्षा अधिक शाखा आहेत.

### ३१ मे २०२२ पर्यंत निवड प्रक्रिया

१५ एप्रिल २०२२ ते ३१ मे २०२२ दरम्यान राज्य कार्यकारिणीची पदाधिकारी निवड प्रक्रिया संघटनाअंतर्गत राबविण्यात येत आहे. निवड सहमती समितीचे अध्यक्ष डॉ. प्रदीप जोशी, सचिव सुशीला मुंडे आणि सदस्य नितीनकुमार राऊत असणार आहेत. या समितीकडे सक्रिय कार्यकर्ते पदाधिकारी यांनी १० मे पर्यंत स्वेच्छा – शिफारस पत्र, संमतीपत्र, ध्येयपत्र आणि व्यक्तिगत माहितीपत्र भरून द्यायचे आहे.

**विवेकाचा आवाज बुलंद करु या!**

**Printed Book Post**

प्रति, ______________________

______________________

______________________

प्रेषक,
संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
प्रा. डॉ. नितीन शिंदे, कल्पतरू,
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली – ४१५४०९.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.